मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २६८ | गुरुवार, ११ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# सिडकोचा कारभार मोगलाई पद्धतीचा

## परंतु देवाभाऊंच्या राज्यात हे चालू देणार नाही : आ.विक्रांत पाटील

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** सध्या सुरू असलेला सिडकोचा कारभार हा मनमानी व मोगलाई पद्धतीचा असून महायुतीच्या देवाभाऊंच्या राज्यात हे चालू देणार नाही, सिडकोच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी धारेवर धरण्यात येईल व सर्वसामान्यांचे प्रश्न कोणत्याही परिस्थितीत धसास लावू असा ठाम निर्धार आज पनवेल येथे घेतलेल्या भरगच्च पत्रकार परिषदेमध्ये आ.विक्रांत पाटील यांनी केला.

या पत्रकार परिषदेमध्ये आ.विक्रांत पाटील यांच्यासह कोकण म्हाडाचे मा.अध्यक्ष बाळासाहेब पाटील, नगरसेविका स्नेहल ढमाले-पाटील, तानाजी खंडागळे, सुभाष कदम, देवीदास खेडकर, प्रदीप देशमुख आदी भाजपा पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना आ.विक्रांत पाटील यांनी सांगितले की, आतापर्यंत अर्थसंकल्प अधिवेशन 2026 मध्ये तारांकित प्रश्न 25 मांडले असून एकूण 170 प्रश्न झाले आहेत. लक्षवेधी 10 मांडल्या असून आतापर्यंत 67 लक्षवेधी मांडण्यात आल्या आहेत. विशेष उल्लेख 3 असून आतापर्यंत सादर 29 केल्या आहेत. औचित्य मुद्दे 4 मांडले असून आतापर्यंत 21 सादर केले आहेत. अल्पकालीन चर्चा 4 मांडल्या असून आतापर्यंत 6 सादर केल्या आहेत. अर्धा तास चर्चा 7 मांडल्या असून आतापर्यंत 14 सादर केल्या आहेत, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. यामध्ये प्रामुख्याने सिडकोने पनवेल तालुक्यातील अधिग्रहित केलेल्या जमिनीवरील शिक्के काढून शेतकऱ्यांना जमिनी परत देणे, मानसरोवर व खांदेश्वर या रेल्वे स्थानकांचा विकास सिडकोने




करणे, पनवेल एसटी डेपो प्रलंबित विकास तत्काळ करणे, गरजे पोटी घरे विषयात अंमलबजावणी करणे, मॅंग्रोज पार्क करणे, सेंट्रल पार्कचा अपूर्ण असलेला विकास पूर्ण करणे, तळोजा आरपीझेड वर थीम पार्क अम्युजमेंट पार्क करणे, तळोजा पार्किंग प्लॉट तत्काळ उपलब्ध करून देणे, रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट करणे, ईएसआयसी हॉस्पिटल करणे, सिडकोने पार्किंग प्लॉटसाठी जागा उपलब्ध करून देणे, पनवेल महानगरपालिकेची स्वतःची परिवहन सेवा सुरू करणे, पनवेल महानगरपालिकेची नवीन इमारत बांधकाम लवकरात लवकर करणे, पनवेल महानगरपालिका मध्ये असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना “ठोक मानधन तत्वावर“ सामावून घेणे, एमएमआरडीए रेंटल हाऊसिंग योजनेतील घरे पनवेल महानगरपालिकेला उपलब्ध होणे, पीएमएवाय करता पनवेल म.न.पा. ला आवश्यक असलेला भूखंड सिडको कडून उपलब्ध करून देणे, इंडोर आउटडोर स्टेडियम करणे, ग्रामीण भाग - नैना क्षेत्र कचरा उचलणे - सिडकोने करावे, पनवेल - विरार कोरिडोर कामकाज जलद गतीने करणे, पनवेल तालुक्यातील कामोठे येथे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासिका केंद्र उभारणे, कासाडी नदी प्रदूषण बाबत उपाय योजना करणे, “महाराष्ट्र राज्य युवा कल्याण आयोग“ स्थापन करणे, ग्रामीण भागातील बांधकामाच्या पूर्व परवानगी या तालुक्याच्या ठिकाणी देण्यात येण्यासाठी प्रयत्न करणे, “सी असोसिएट“ या कंपनीने नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र नयना व नवी मुंबई साठी तयार केलेला वाहतूक आराखडा कृतीत आणणे, पनवेल पोलीस स्टेशन कर्मचारी वसाहत नव्याने बांधणे, पनवेल येथे अद्यावत आंतरराष्ट्रीय दर्जाचे ॲक्वेरियम उभारणे, नेरा व टिंबर मार्केट येथे सबस्टेशन मागणी यासारखे आतापर्यंत पाठपुरावा करून सोडविण्यात काही अंशी सफल झालो आहोत तर काही मार्गस्थ आहेत. यासाठी शासनाची पूर्ण मदत मिळत आहे. त्यामुळे जनतेचे सेवक म्हणून आम्ही काम करत असताना सिडकोचे काही मग्रुर अधिकारी नाहक लोकांना त्रास देवून त्यांच्या कामाची अडवणूक करत असतील तर हे शासन अजिबात सहन करणार नाही व त्यांना याबाबतचा जाब विचारला जाईल, या संदर्भात कोणाच्या तक्रारी असल्यास त्यांनी माझ्या जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या तक्रारी मांडाव्यात, असेही आवाहन त्यांनी केले. नैना प्रश्न, सिडकोच्या घरांच्या प्रश्न असो, विजेचा प्रश्न असो, नव्याने घर घेणाऱ्या घर मालकांना सिडको आकारत असलेले वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्सचा प्रश्न असो किंवा गरजेपोटी बांधलेल्या घरांचा प्रश्न असो, वाहतूक कोंडीचा प्रश्न असो, बेकायदेशीर बांधकामांचा प्रश्न असो याबाबत शासनाकडे पाठपुरावा करून हे प्रश्न मार्गस्थ लावणार व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी कटीबद्ध असल्याचे सांगून आगामी पावसाळी अधिवेशनात पनवेलकरांचे हिताचे विषय मांडणार असल्याचे व धसास नेणार असल्याचे आ.विक्रांत पाटील यांनी सरतेवेळी सांगितले.




# आंबोडा परिसरात एलसीबीचा सापळा यशस्वी!

**अंबोडा येथे गावठी पिस्टलसह युवक जेरबंद; ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त महागाव पोलिस ठाण्यात शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल**

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव : (यवतमाळ ) :** जिल्ह्यातील अवैध धंदे, अवैध शस्त्र बाळगणारे, सराईत गुन्हेगार तसेच अमली पदार्थ तस्करांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) यवतमाळने महागाव तालुक्यातील आंबोडा येथे धडक कारवाई करत गावठी बनावटीच्या देशी पिस्टलसह एका युवकाला अटक केली. आरोपीकडून एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस असा एकूण ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.) यांनी जिल्ह्यातील अवैध शस्त्रधारक, गुन्हेगार व तस्करांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी आपल्या अधिनस्त पथकांना गोपनीय माहितीच्या आधारे प्रभावी छापेमारी करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, ९ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरखेड उपविभागातील महागाव पोलीस ठाणे हद्दीत आरोपी शोध मोहिमेवर असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आंबोडा गावाजवळील तुळजापूर–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील 'अतिथी हॉटेल' परिसरात एक इसम गावठी पिस्टलसह संशयास्पदरीत्या थांबला आहे.

माहितीची शहानिशा करत एलसीबीच्या पथकाने पंचांसह घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. संशयित इसमाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव रवि संतोष शिंगारे (वय २९), रा. धम्मनगर, श्रीरामपूर, ता. पुसद, जि. यवतमाळ असे सांगितले.

त्याची अंगझडती घेतली असता कमरेला लपवून ठेवलेले गावठी बनावटीचे देशी पिस्टल (किंमत अंदाजे ३० हजार रुपये) तसेच एक जिवंत काडतूस (किंमत १ हजार रुपये) आढळून आले. पोलिसांनी तात्काळ शस्त्र व काडतूस जप्त करून आरोपीला अटक केली.

या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२०/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

**अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक धिरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, सहाय्यक फौजदार मुन्ना आडे, संतोष भोरगे, पोलीस हवालदार तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, पोलीस शिपाई सुनील पंडागळे तसेच चालक पोलीस उपनिरीक्षक रविंद्र शिरामे यांनी सहभाग घेतला.



# राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स 2026 पुरस्कार सोहळ्याचे अहिल्यानगर येथे आष्टी तालुका युवा पत्रकार संघातर्फे आयोजन




**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, आष्टी, जि. बीड यांच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ पुरस्कार वितरण सोहळ्याचे भव्य आयोजन अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व जनहिताचे कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान या सोहळ्यात करण्यात येणार असून, राज्यभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

हा पुरस्कार सोहळा शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल मेघनंद लॉन्स अँड रेस्टॉरंट, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार लोकनेते, मराठवाडा भूषण सुरेश (आण्णा) धस भूषविणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार संग्राम (भैय्या) जगताप (अहिल्यानगर), आमदार काशिनाथ दाते (पारनेर), आमदार अक्षय (दादा) कर्डिले (राहुरी), श्रीमती ज्योतीताई गाडे (महापौर, अहिल्यानगर), पोपटराव पवार (पद्मश्री, कार्याध्यक्ष आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती, महाराष्ट्र राज्य), ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज (श्री क्षेत्र गणेश गड संस्थान, नागतळा), धनंजय जाधव (उपमहापौर, अहिल्यानगर) तसेच संपत बारस्कर (ज्येष्ठ नगरसेवक, अहिल्यानगर) उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून

श्रीमती सुधाताई कांकरिया (समाजसेविका व प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ, अहिल्यानगर,अनिल लगड (अध्यक्ष, पत्रकार संघ अहिल्यानगर), मनसुरभाई शेख (राज्य कोषाध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद), श्रीमती रेश्माताई आठरे (महिला जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी अजित पवार गट, अहिल्यानगर),श्रीमती रेश्माताई जगताप (सातारा जिल्हा संपर्कप्रमुख, शिवसेना शिंदे गट),श्रीमती डॉ. स्वातीताई जाधव (शिवसेना महिला आघाडी शिंदे गट, जिल्हाप्रमुख, अहिल्यानगर,गणेश मोकाशी (राज्य उपाध्यक्ष, आ.भा.म.प.परिषद, महाराष्ट्र), श्रीमती सुवर्णाताई गि-हे (उपविभागीय अध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र) आणि श्रीमती रेणुकाताई वराडे (अध्यक्षा, रणरागिनी महिला ग्रुप, नगर जिल्हा), ) यांचाही विशेष सहभाग राहणार आहे.यंदाचे वर्ष हे या पुरस्कार सोहळ्याचे आठवे वर्ष असून, गेल्या सात वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्काराने गौरविण्याची परंपरा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने जपली आहे. सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, कृषी, उद्योग, आरोग्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि जनसेवा अशा विविध क्षेत्रांत उत्कृष्ट योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराद्वारे सन्मानित करण्यात येते.

या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक अविनाश कदम (अध्यक्ष, आष्टी तालुका युवा पत्रकार संघ तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद) असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आयोजन समिती कार्यक्रमाच्या तयारीत कार्यरत आहे. संयोजन समितीत उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, संतोष नागरगोजे, समीर शेख, अतुल जवणे, प्रेम पवळ,निसार शेख, राजेंद्र लाड, अक्षय विधाते, सोपान पगारे, ॲड. किशोर निकाळजे, सिताराम पोकळे (जेष्ठ पत्रकार), सय्यद बबलू, मनोज सातपुते, विठ्ठल राख, दादा पवळ, अमोल जगताप, अशोक कुताळ, आदिनाथ ठोंबरे, संतोष तांगडे, मारुती सत्रे, अतुल जाधव, किरण शिनगिरे, ओंकार कदम, संस्कार लाड, सचिन पवार आदींचा समावेश आहे. राज्यभरातील पत्रकार, समाजसेवक, उद्योजक, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणारा हा पुरस्कार सोहळा कर्तृत्ववान व्यक्तींना प्रेरणा देणारा आणि समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन देणारा ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुरस्कार विजेत्यांचा गौरव करण्याचे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## पालघर संत हत्याकांडातील पीडित कुटुंबांना न्याय मिळणार?

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे निवेदन; आर्थिक मदत, दोषींना शिक्षा आणि स्मारक उभारणीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** पालघर संत हत्याकांडातील दिवंगत संत व वाहनचालकाच्या कुटुंबीयांसह समाजसेवक अरुण शुक्ल यांनी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यामध्ये पीडित कुटुंबांना आर्थिक मदत, हत्याकांडातील दोषींना कठोर शिक्षा तसेच पालघर येथे दिवंगत संतांचे स्मारक उभारण्याची प्रमुख मागणी करण्यात आली.

यावेळी दिवंगत वाहनचालकाच्या मातोश्री निर्मला तेलंगडे व त्यांच्या कुटुंबीयांसह संत सुशील गिरी यांच्या भगिनी सपना मिश्रा उपस्थित होत्या. ब्रिजेश पांडे यांनीही या उपक्रमात सहकार्य केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदनाची दखल घेत सर्व मागण्यांबाबत सकारात्मक विचार करून न्याय देण्याचे आश्वासन दिल्याची माहिती अरुण शुक्ल यांनी दिली.

या प्रसंगी मा. ब्रजमोहन पांडे आणि आमदार



Sanjay Upadhyay यांचे विशेष सहकार्य लाभल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

"पालघरच्या संतांना न्याय, पीडितांना आधार आणि स्मृतींना सन्मान" या भावनेतून करण्यात आलेल्या या मागण्यांकडे राज्यभरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

## पत्रकारांनी निर्भीड पत्रकारिता कराव –माजी खासदार डॉ .खुशाल बोपचे

### पहेला ( भंडारा ) येथे "सन्मान द्या सन्मान घ्या" पत्रकार संजीव भांबोरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळा ( मंगळ. ०९ जून ) ला भंडारा तालुक्यातील पहेला येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे म्हणाले की, "आजच्या काळात निर्भिड पत्रकारीच करावी, आज जर सोशल मिडीया नसता तर जग एक पाऊल पुढे नसते, म्हणून सामाजिक प्रसारमाध्यमांवर आज भारतात विशेष लक्ष दिले जात आहे" असे प्रभावशाली प्रतिपादन केले.

पहेला ( भंडारा ) येथे संपादक, ज्येष्ठ पत्रकार संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त "सन्मान द्या सन्मान घ्या" हा भरगच्च कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मंचावर उदघाटक दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे , छत्रपती संभाजीनगरचे मुख्य संपादक




दशरथ सुरडकर, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. डॉ. खुशाल बोपचे, विशेष अतिथी चित्रपट अभिनेते अश्विनकुमार वघाले, अभिनेत्री चैताली भस्मे, प्रसिद्ध नृत्यांगना वैशाली मडावी, माजी सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे, व अभिष्टचिंतन सत्कारमूर्ती संजीव भांबोरे, मराठवाड्यातील फुले, शाहू, आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते अशोक सोनवणे, अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष गणेश पारधी,आदी मान्यवर हजर होते. येथे विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, गुणवंत विद्यार्थी, पत्रकार, प्रबोधनकार, महिला सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी यांचा मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी खा. डॉ. खुशाल बोपचे म्हणाले की, आजच्या भयंकर गैरव्यवहारीय, भ्रष्टाचार फोफावलेल्या काळात निर्भिड पत्रकारीच करावी. आज जर सोशल मिडीया नसता तर जग एक पाऊल पुढे नसते. एका सेकंदात जागृत नागरिक सोशल मिडीयातून अन्याय, गैरव्यवहार, भ्रष्टाचार जनतेसमोर उघडकीस करीत आहे" असे प्रभावशाली प्रतिपादन केले. यावेळी संपादक संजीव भांबोरे म्हणाले की, हा कार्यक्रम माझा एकट्याचा नाही, तर माझ्या वाढदिवसाला गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रातील मान्यवर, कर्तव्यदक्ष अधिकारी ,कर्मचारी , प्रबोधनकार,कवी,हे सन्मानित झाले पाहिजे असे प्रतिपादन केले. या अभिनव सोहळ्याचे प्रास्ताविक प्राध्यापक राजेश नंदपूरे यांनी केले .संचालन न्यूज प्रवक्ता संजना भांबोरे यांनी तर आभार प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे जिल्हा सचिव श्रीकृष्ण देशभ्रतार यांनी मानले.

---

## पनवेल शहर वाहतूक शाखेच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव; अधिकारी व अंमलदारांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पोलीस उप आयुक्त, (वाहतूक) नवी मुंबई, डॉ. राहुल खाडे यांनी पनवेल शहर येथे भेट देऊन पनवेल शहर वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत असलेल्या उत्कृष्ट कामकाजाची तसेच वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या वाहतूक उपाययोजनांची दखल घेऊन समाधान व्यक्त केले.

पनवेल शहर वाहतूक शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी रस्ते अपघाताच्या ठिकाणी तात्काळ मदत करून जखमींना रुग्णालयात दाखल करून त्यांचे प्राण वाचविण्याचे उल्लेखनीय कार्य केले. तसेच मोटरसायकल ट्रॅपच्या माध्यमातून वाहनचोरीचा प्रयत्न उधळून लावत आरोपीस ताब्यात घेण्यात आले. याशिवाय शाळेतील विद्यार्थ्यांच्या परिसरात वाहनाद्वारे बाईकवरून हायड्रो गांजाची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन संबंधित अधिकारी व अंमलदारांना बक्षीस मंजूर करण्यात आले. तसेच त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.



या कामगिरीमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील, पोलीस उपनिरीक्षक कदम, पोलीस हवालदार अमीर मुलाणी, केशव निकम, सतीश वाघमारे, महेंद्र राजपूत, सागर यादव, राकेश घाडगे, तसेच पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ, सचिन शिंदे, यांचा समावेश असून त्यांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी पोलीस उप आयुक्त (वाहतूक) डॉ. राहुल खाडे यांनी रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रभावी वाहतूक नियमन व कठोर अंमलबजावणी करून 'झिरो अपघाती मृत्यू' हे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच वाहतूक पोलीस हे तेथील पोलीस प्रशासनाचा चेहरा असून त्यांनी नागरिकांशी नेहमी सौजन्यपूर्ण, शिस्तबद्ध व जबाबदारीने वर्तन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. याकार्यक्रमास पनवेल शहर वाहतूक शाखेचे तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

---

## पेरणीपूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासा उमरी तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : खरीप हंगामातील पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी घरचे असो वा बाजारातून खरेदी केलेले बियाणे असो, त्याची उगवण क्षमता तपासणी करूनच पेरणी करावी, असे आवाहन उमरी तालुका कृषी अधिकारी श्री. शिवाजी मिरासे यांनी केले आहे. यंदा एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध बियाण्याची गुणवत्ता व उगवण क्षमता तपासणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे कृषी अधिकारी श्री.मिरासे यांनी सांगितले की, उगवण क्षमता चाचणीमुळे बियाण्याच्या दर्जाबाबत खात्री मिळते तसेच ते पेरणीयोग्य आहे की नाही हे समजते. बियाण्याची उगवणक्षमता किती आहे. याचा अंदाज आल्याने आवश्यक बियाण्याचे प्रमाण निश्चित करता येते आणि प्रति एकर आवश्यक रोपसंख्या राखणे शक्य होते.

**अशी करा गोणपाट पद्धतीने उगवण क्षमता तपासणी**

उगवण क्षमता तपासण्यासाठी गोणपाट






पद्धत अत्यंत सोपी असून ती शेतकरी घरच्या घरी करू शकतात. यासाठी बियाण्यांमधून १०० दाण्यांचा नमुना निवडावा. हे दाणे ओल्या गोणपाटामध्ये व्यवस्थित गुंडाळून सावलीत किंवा उबदार ठिकाणी ठेवावेत. पुढील ६ ते ७ दिवस गोणपाट ओलसर राहील याची काळजी घेत अधूनमधून पाणी शिंपडावे. त्यानंतर रुजलेल्या बियांची संख्या मोजावी. १०० पैकी ७० किंवा त्यापेक्षा जास्त बिया उगवल्यास संबंधित बियाणे पेरणीसाठी योग्य व दर्जेदार समजले जाते.

उगवण क्षमता आधीच तपासल्यामुळे निकृष्ट किंवा कमी उगवण असलेले बियाणे ओळखता येते. त्यामुळे नवीन बियाण्याची वेळेत व्यवस्था करून संभाव्य नुकसान टाळता येते. तसेच बियाण्यावरील अनावश्यक खर्च वाचून दुबार पेरणीची वेळ येत नाही.

चांगली उगवण झाल्यास शेतातील सर्व रोपे जवळपास एकाच वेळी उगवतात. त्यामुळे पिकाची वाढ, फुलोरा आणि परिपक्वता एकसमान होऊन पिकाची जोमदार वाढ होते. योग्य रोपसंख्या व निरोगी उगवण यामुळे उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांना अधिक आर्थिक लाभ मिळतो.शेतकऱ्यांनी पेरणीच्या अगोदर घाई गडबडीत बियाणे खरेदी करण्याऐवजी किमान ७ दिवस आधी बियाणे खरेदी करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्री. शिवाजी मिरासे यांनी केले आहे. बियाणे वेळेवर खरेदी केल्यास त्याची उगवण क्षमता तपासण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होतो. उगवण क्षमता कमी आढळल्यास पर्यायी बियाण्याची व्यवस्था करता येते. त्यामुळे पेरणीचा हंगाम वेळेत पूर्ण होऊन दुबार पेरणी व आर्थिक नुकसान टाळता येते. तसेच अधिकृत विक्रेत्याकडून पावतीसह बियाणे खरेदी करण्याचा सल्लाही त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

---

## देवकीबाई बैरागी यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : वाहेगाव येथील गं.भा. देवकीबाई केशवदास बैरागी (९०) यांचे शनिवार, दि. ७ जून २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे व असा मोठा परिवार आहे. त्या शिक्षक रमेश केशवदास बैरागी व इंडिया न्यूज 24 तास संचालक मुख्यसंपादक /बोल नाशिक दैनिकाचे कार्यकारीसंपादक देविदास बैरागी यांच्या मातोश्री होत्या.

---

## सिल्लोड येथे खत टंचाई व ॲप्स विरोधात क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छ. संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील शेतकऱ्यांना आवश्यक रासायनिक खते वेळेवर उपलब्ध होत नसल्याने निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, क्रांतिकारी शेतकरी संघटना, सिल्लोड यांच्या वतीने तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात




आले.यावेळी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध समस्या मांडण्यात आल्या. खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, सर्व खत विक्री केंद्रांवर पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध करून द्यावे, तसेच कृषी विभागाचे बंद पडलेले ॲप तातडीने सुरू करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनादरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रसाद पाटील वराडे यांनी प्रशासनाचे लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे वेधले. तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सुनील शिंदे, राजू पाटील वराडे, सागर साखळी, गजानन साखळी, विनोद लहाने आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## सिल्लोडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा ; कार्यकर्त्यांचा जनसेवेचा संकल्प

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक प्रवासात गेल्या २७ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने लोकहिताची भूमिका निभावत जनतेचा विश्वास जपला आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन सिल्लोड येथील राष्ट्रवादी भवन येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पक्षाचे प्रेरणास्थान स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी पक्षाच्या २७ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला आणि जनसेवेचे कार्य अधिक जोमाने करण्याचा संकल्प केला.या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष प्रवीण पाटील काकडे, शहराध्यक्ष शेख अमान, युवक शहराध्यक्ष अक्षय पाटील, युवक तालुकाध्यक्ष पंढरी पांढरे, ओबीसी शहराध्यक्ष नारायण पुरी, युवक कार्याध्यक्ष अनिकेत पाटील यांच्यासह ठगणराव भागवत पाटील मित्र मंडळाचे श्री विलास पाटील गोराडे, एकनाथ मिरगे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फसव्या कर्ज माफीच्या परिपत्रकातील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आज होळी . : कॉ .महादेव नागरगोजे

## शेतकऱ्यांची दिशाभूल केल्याचा सरकारवर किसान सभेचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी "शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू" असे गाजावाजा करत आश्वासन दिले, मात्र सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची सर्रास फसवणूक केल्याचा गंभीर आरोप करत भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे यांनी राज्य सरकार विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६" ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आणि फसवी कर्जमाफी असल्याचा आरोप करत या योजनेच्या परिपत्रकाची (जी. आर.) होळी करण्याचा इशारा देण्यात आला आहे. किसान सभेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निवडणुकीपूर्वी दिलेल्या संपूर्ण कर्ज माफीच्या आश्वासनाचा सरकारला विसर पडला असून आता केवळ दिखाऊ आणि तुटपुंज्या कर्ज माफीद्वारे शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. राष्ट्रीयकृत बँका व सेवा सहकारी संस्थांनी सप्टेंबर-२०२५ पूर्वीच "नवे-जुने" करून लाखो शेतकऱ्यांना कर्ज माफीच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा कट रचल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, एकीकडे मुख्यमंत्री ३० जून-२०२६ पर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याची भाषा करतात, तर दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे कारण पुढे करून कर्जमाफी टाळण्याचा प्रयत्न करतात. ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या कर्ज माफीची घोषणा ही केवळ आकड्यांची जादू असून प्रत्यक्षात लाखो शेतकरी लाभापासून दूर राहणार असल्याचा दावा किसान सभेने केला आहे. तामिळनाडू सरकारने सत्तेत आल्यानंतर अल्पावधीत शेतकऱ्यांची कर्ज माफी केली, मात्र महाराष्ट्र सरकार केवळ घोषणा आणि परिपत्रकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याची टिका निवेदनात करण्यात आली आहे. या कथित फसव्या कर्ज माफीच्या निषेधार्थ गुरुवार दिनांक ११ जून-२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता पाटोदा येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र शासनाच्या जी.आर. ची जाहीर होळी करण्यात येणार असल्याची घोषणा किसान सभेने केली आहे. या निवेदनावर किसान सभा उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे, सुखदेव नागरगोजे, भरत नागरगोजे, रावसाहेब गिते, दिनकर नागरगोजे, रामकुवर नागरगोजे, रामकिसन गिते, जालिंदर शिडगे सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. "संपूर्ण कर्जमाफी द्या, शेतकऱ्यांची फसवणूक थांबवा" या मागणीसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ही किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# बहुलीत राज्यपुष्प 'जारुळ' उमलले; पुष्प जन्माचे पाळणा हलवून स्वागत

## महिलांनी दिला वृक्ष महतीचा राज्याला संदेश

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचा राज्यपुष्प व हरित मानचिन्ह असलेला 'जारुळ-ताम्हण' (प्राइड ऑफ इंडिया) हा वृक्ष सिल्लोड तालुक्यातील बहुली येथे उमलला आहे. या पुष्प जन्माचे ग्रामस्थांनी चक्क 'पाळणा' हलवून व मिठाई वाटून अत्यंत उत्साहात स्वागत केले. मानवी जन्मा इतकेच झाड महत्त्वाचे असून त्याचे संगोपन मौलिक आहे, असा संदेश यातून महिलांनी संपूर्ण राज्याला दिला आहे.

जुलै २०२२ मध्ये बहुली येथे ग्रामस्थ, सामाजिक वन विभाग व डॉ. संतोष पाटील यांच्या पुढाकाराने शासकीय जमिनीवर ४ हजार वृक्षांचा जैवविविधता प्रकल्प उभारण्यात आला. संपूर्ण गावाने स्वखर्चातून तार कंपाऊंड व ठिबक सिंचनाची सोय करून ही झाडे वाढवली आहेत. या प्रकल्पात तालुक्यास अपरिचित असलेल्या 'जारुळ-ताम्हण' या राज्यपुष्प वृक्षाची





### डॉ. संतोष पाटील यांचे वृक्ष संवर्धनाचे आवाहन

**"शिक्षकांनी 'एकच लक्ष... प्रत्येक शाळेत राज्यपुष्प वृक्ष' हा उपक्रम राबवावा. यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करू. जैवविविधता संवर्धनासाठी हे रोपण महत्त्वाचे आहे. हा वृक्ष 'सेंटार ओक' व 'लार्ज ओक ब्ल्यू' या प्रजातींच्या फुलपाखरांचा 'होस्ट प्लांट' असून याची फुले मधमाशा व कीटकांना आकर्षित करतात."**

लागवड करण्यात आली होती. त्यातील एका आठ फूट उंचीच्या वृक्षास अकरा दिवसांपूर्वी कळ्या आल्या होत्या आणि बाराव्या दिवशी हे फूल उमलले. या भागात हा वृक्ष वन्य अवस्थेत नसून, त्याची लागवड जिल्ह्यात मोजक्याच ठिकाणी झाली आहे.

•वृक्षाचे बारसे आणि 'अमृता' नामकरण•

यावेळी गावातील महिला भगिनींनी पाळणा सजवून त्यात राज्यपुष्प ठेवून पाळणा गीत गायले. झाडाचे औक्षण करून सेंद्रिय खताने त्याची ओटी भरण्यात आली. प्रत्येक महिलेने झाडालगतच्या मातीत जैविक सेंद्रिय खत मिसळून औक्षण केले. राजस्थानमधील १७ व्या शतकातील अमृता देवी बिष्णोई, त्यांचे कुटुंब व गावातील ३६७ लोकांनी खेजडीची झाडे वाचवण्यासाठी दिलेले बलिदान आणि त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ या फुलाचे 'अमृता' असे नामकरण करण्यात आले.

तसेच या मानव निर्मित वनाला 'अमृतवन' असे नाव गावाने निश्चित केले आहे.

याप्रसंगी अंजना सोनवणे, नंदा निकोद, साधना तुपे, कांता निकोद, पद्मा निकोद, तेजस्विनी सोनवणे आदी महिलांसह भाऊसाहेब निकोद, आप्पा निकोद, देविदास पांडवणे, भगवान खंबाट, राधाकृष्ण साखळे, भिकन सोनोणे, रवींद्र तुपे, सोहम जंजाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोकशाहीला सुरुंग? लाडेगावात दुबार मतदार नोंदींचा स्फोट ; दोषींवर फौजदारी कारवाईची जोरदार मागणी!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** लोकशाही व्यवस्थेचा पाया मानल्या जाणाऱ्या मतदार यादीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा धक्कादायक प्रकार कारंजा (लाड) तालुक्यातील लाडेगाव येथे समोर आला आहे. ग्रामपंचायत मतदार यादीतील काही मतदारांची नावे एकाच वेळी दोन वेगवेगळ्या मतदान केंद्रांच्या यादीत आढळून आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या प्रकारामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिक आणि स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

प्राप्त माहितीनुसार, लाडेगाव ग्रामपंचायत प्रशासनाने तहसीलदार तथा निवडणूक नोंदणी अधिकारी, कारंजा (लाड) यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत काही मतदारांची नावे लाडेगावच्या मतदार यादीत असतानाच इतर गाव किंवा शहरांच्या मतदार यादीतही असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या संदर्भातील ईपीआयसी क्रमांक, मतदान केंद्रांची माहिती, ईआरओ व बीएलओ स्तरावरील नोंदी तसेच इतर आवश्यक कागदपत्रे संकलित करून तहसील प्रशासनाकडे सादर करण्यात आली आहेत.मतदार यादीतील दुबार नोंदी ही केवळ प्रशासकीय चूक आहे की त्यामागे काही हेतुपुरस्सर गैरप्रकार आहे, याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे. निवडणूक प्रक्रियेत प्रत्येक मताला अनन्यसाधारण महत्त्व असताना एका व्यक्तीचे नाव दोन ठिकाणी असणे ही गंभीर बाब मानली जात आहे. अशा प्रकारामुळे मतदान प्रक्रियेत गोंधळ निर्माण होऊ शकतो, तसेच निवडणुकीच्या निष्पक्षतेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तक्रारीमध्ये संबंधित मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांचे कायमस्वरूपी वास्तव स्थान निश्चित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नियमानुसार एका ठिकाणची मतदार नोंद कायम ठेवून दुसऱ्या ठिकाणची नोंद तातडीने वगळण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. मतदार यादीतील त्रुटी दूर करून ती अधिक अचूक आणि विश्वासार्ह बनविण्याची गरज या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली आहे.विशेष म्हणजे, चौकशीदरम्यान एखाद्या व्यक्तीने जाणूनबुजून दोन ठिकाणी मतदार म्हणून नोंद कायम ठेवली असल्याचे अथवा मतदान प्रक्रियेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध निवडणूक कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेची पवित्रता अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकरणांमध्ये कठोर आणि उदाहरणात्मक कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.दरम्यान, तहसील कार्यालयाने या तक्रारीची गंभीर दखल घेतली असून संबंधित प्रकरणांची प्राथमिक चौकशी सुरू करण्यात आली आहे. सर्व नोंदींची पडताळणी करून नियमांनुसार योग्य तो निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मिळत आहे. चौकशीअंती सत्य परिस्थिती समोर आल्यानंतर आवश्यक त्या प्रशासकीय व कायदेशीर कारवाया केल्या जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.या प्रकरणामुळे मतदार यादी शुद्धीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह राहण्यासाठी मतदार यादीतील प्रत्येक नोंद अचूक असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे लाडेगावातील दुबार मतदार नोंदींच्या या प्रकरणाचा छडा लावून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षा आता नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

"एक व्यक्ती, दोन मतदार नोंदी आणि दोन मतदान केंद्रे... हा केवळ तांत्रिक दोष आहे की लोकशाही व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न?"

# मोबाईल टॉवरमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका ? 'इंडस टॉवर्स' हटविण्याची ग्रामपंचायतीकडे अंतिम मागणी

## अन्यथा उच्च न्यायालयात जनहित याचिकेचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** आनंदनगर ता.इंदापूर येथील मिळकत क्रमांक ७१८ वर उभारण्यात आलेला इंडस टॉवर्स कंपनीचा मोबाईल टॉवर तात्काळ हटवून नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करावे,अशी अंतिम मागणी ग्रामविकास अधिकारी,आनंदनगर ग्रामपंचायतीकडे करण्यात आली आहे.ही मागणी सामाजिक कार्यकर्ते शशिकांत सत्यवान गेजगे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली असून,अन्यथा मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,सदर मोबाईल टॉवरमधून होणाऱ्या रेडिएशनमुळे तसेच टॉवर परिसरातील जनरेटर व मशिनरीमधून निर्माण होणाऱ्या उच्च डेसिबलच्या कर्कश आवाजामुळे परिसरातील काही नागरिकांना गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत असून,काहींना कायमस्वरूपी कर्णबधिरपणाचा त्रास झाल्याचा दावा करण्यात आला आहे.यासंदर्भात यापूर्वीही ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा लेखी तक्रारी देण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.मात्र ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसून झालेली कारवाई ही केवळ दिशाभूल करणारी असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीची ही उदासीनता आणि टाळाटाळ संशयास्पद व निषेधार्ह असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार प्रत्येक नागरिकाला आरोग्यदायी जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त आहे.तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचे रक्षण करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन मोबाईल टॉवर हटविण्यासंदर्भात तात्काळ आणि अंतिम निर्णय घ्यावा, अन्यथा जनहित याचिकेद्वारे न्यायालयीन दाद मागण्यात येईल.त्यातून उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय परिणामांची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाची राहील,असा स्पष्ट इशारा सामाजिक कार्यकर्ते शशिकांत सत्यवान गेजगे यांनी दिला आहे. दरम्यान,या प्रकरणामुळे आनंदनगर परिसरात नागरिकांच्या आरोग्यविषयक सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात असून ग्रामपंचायत प्रशासन आता कोणती भूमिका घेणार,याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# श्रीवर्धनात राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडावंदन सोहळा ; संघटनात्मक ऐक्याचे दर्शन




**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला झेंडावंदन कार्यक्रम आज सकाळी १० वाजून १० मिनिटांनी श्री. स्वप्नील पाब्रेकर यांच्या निवासस्थानी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पक्षाच्या विचारांप्रती निष्ठा व्यक्त करत आणि संघटनात्मक एकजूट दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास श्रीवर्धन तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री. मंदार तोडणकर, महिला तालुका अध्यक्षा श्रीमती सभा फिरफिरे, तालुक्यातील विविध सेलचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, तसेच विविध गावांचे सरपंच, उपसरपंच आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी पक्षाचा झेंडा फडकावून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ध्येय-धोरणांप्रती कटिबद्ध राहण्याचा संकल्प करण्यात आला. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमादरम्यान पक्षातील ज्येष्ठ व युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची एकजूट या कार्यक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

झेंडावंदनानंतर उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परस्पर संवाद साधत आगामी राजकीय व संघटनात्मक उपक्रमांबाबत चर्चा केली. कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

# आवास–रेवदंडा किनारपट्टीला दिलासा; २५ नवीन ट्रान्सफॉर्मर तातडीने देण्याचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** रायगड जिल्ह्यातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, वाढत्या वीज मागणीमुळे निर्माण झालेला ताण आणि रखडलेल्या विकासकामांच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महावितरण अधिकाऱ्यांची कानउघाडणी करत मान्सूनपूर्वी सर्व अपूर्ण कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले . विशेषतः पर्यटनामुळे झपाट्याने विकसित होत असलेल्या आवास ते रेवदंडा किनारपट्टी परिसरासाठी १०० केव्ही क्षमतेचे २५ नवीन ट्रान्सफॉर्मर तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आदेश त्यांनी दिले.मुंबई येथील एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या कार्यालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत रायगड जिल्ह्यातील वीजपुरवठ्याशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत भाजपचे ज्येष्ठ नेते व जिल्हा सरचिटणीस सतीश धारप यांनी आवास–रेवदंडा किनारपट्टी भागातील वाढत्या वीज समस्यांकडे लक्ष वेधले. त्यानंतर ऊर्जा राज्यमंत्र्यांनी महावितरण अधिकाऱ्यांना तातडीच्या उपाययोजना राबविण्याचे आदेश दिले.

**पर्यटन वाढले; पण वीज यंत्रणा अपुरी**




आवास, किहीम, सासवणे, चौल, रेवदंडा आदी किनारपट्टी भागात गेल्या काही वर्षांत पर्यटन व्यवसायात मोठी वाढ झाली आहे. होमस्टे, कॉटेज, रिसॉर्ट, पर्यटन सुविधा आणि नव्या निवासी प्रकल्पांमुळे विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र त्यानुसार वीज पायाभूत सुविधांचा विस्तार न झाल्याने कमी दाबाचा वीजपुरवठा, वारंवार खंडित होणारी वीज आणि ट्रान्सफॉर्मरवरील वाढलेला भार यांसारख्या समस्या नागरिकांना भेडसावत आहेत.याची गंभीर दखल घेत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महावितरणला या भागात विशेष शिबिरे आयोजित करून ग्राहकांच्या तक्रारी जागेवरच निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. तसेच पीएम सूर्य घर योजनेची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून सौरऊर्जेचा वापर वाढविण्यावरही भर देण्याचे निर्देश दिले.

**परळी येथे नवीन सबस्टेशनला मंजुरी**

**"आवास–रेवदंडा किनारपट्टीच्या वीजप्रश्नांना अखेर प्राधान्य"**
**पर्यटनामुळे झपाट्याने वाढलेल्या आवास–रेवदंडा परिसरातील वीज मागणीचा प्रश्न प्रथमच राज्यस्तरावरील बैठकीत ठळकपणे मांडला गेला. २५ नवीन ट्रान्सफॉर्मर, विशेष तक्रार निवारण शिबिरे आणि पायाभूत सुविधांच्या विस्ताराच्या निर्णयामुळे किनारपट्टी भागातील नागरिक, व्यावसायिक आणि पर्यटन क्षेत्राला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

बैठकीत पाली शहरासह संपूर्ण सुधागड तालुक्यातील वाढत्या वीजभाराचा प्रश्न देखील जोरकसपणे मांडण्यात आला. अष्टविनायक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या बल्लाळेश्वर पाली आणि परिसरातील वाढत्या वीज वापरामुळे निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन परळी येथे नवीन वीज उपकेंद्र (सबस्टेशन) उभारण्यास मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे आदेशही देण्यात आले.

***मान्सूनपूर्वी कामे पूर्ण करण्याचे आदेश***

मान्सून काळात रायगड जिल्ह्यात वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना वाढतात. त्यामुळे रखडलेली लाईन दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मर बदल, नवीन जोडण्या, फिडर सुधारणा आणि इतर पायाभूत कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश ऊर्जा राज्यमंत्र्यांनी दिले. अपूर्ण कामांबाबत कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

बैठकीस भाजप नेते सतीश धारप, जिल्हा परिषद सदस्य व सभापती वैकुंठ पाटील, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील, हिरवळ प्रतिष्ठानचे संस्थापक किशोर धारिया, भाजपा पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.महावितरणकडून कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता संजय पाटील, अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, कार्यकारी अभियंता राजेश भगत, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आकाश तायडे, कार्यकारी अभियंता अविनाश पगारे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ₹305.70 कोटींच्या FD घोटाळ्याचा स्फोट? वाशिम जिल्हा परिषदेत निधी अडकविल्याचा गंभीर आरोप; राम पाटील डोरले यांची उच्चस्तरीय चौकशीची मागणी!

## "विकासासाठी आलेला निधी बँकांमध्ये का ठेवला?" — आम आदमी पार्टीचा सवाल; दोषींवर ACB कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२५ आर्थिक वर्षातील विकासकामांसाठी प्राप्त झालेला तब्बल ₹३०५ कोटी ७० लाखांचा शासकीय निधी खर्च न करता विविध बँकांमध्ये मुदत ठेवी (FD) स्वरूपात गुंतविण्यात आल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी केला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे सादर केलेल्या स्मरणपत्राद्वारे केली आहे.

राम पाटील डोरले यांनी केलेल्या आरोपांमुळे जिल्हा परिषदेतील आर्थिक कारभाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून, विकासकामांसाठी मंजूर झालेला निधी प्रत्यक्ष कामांवर खर्च करण्याऐवजी बँकांमध्ये मुदत ठेवी म्हणून ठेवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे केंद्र शासनाने वाशिम जिल्ह्याला "आकांक्षित जिल्हा" म्हणून घोषित केले असून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, ग्रामीण रस्ते, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र हा निधी जनतेच्या विकासासाठी वापरण्याऐवजी बँकांमध्ये गुंतविण्यात आल्याने विकास प्रक्रियेलाच खीळ बसल्याचा आरोप डोरले यांनी केला आहे.



तक्रारीनुसार, जिल्हा परिषदेच्या विविध निधींपैकी जिल्हा निधीचे ₹१६५.८५ कोटी, उपकर निधीचे ₹६८ कोटी, अभिकरण निधीचे ₹३२ कोटी आणि इतर विविध निधीचे ₹३९.८५ कोटी असे एकूण ₹३०५.७० कोटी विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांमध्ये मुदत ठेवी स्वरूपात ठेवण्यात आले आहेत. हा निधी विकासकामांसाठी उपलब्ध असताना तो प्रत्यक्ष खर्च न केल्यामुळे अनेक कामे रखडल्याचेही डोरले यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

> **"१५ दिवसांत चौकशी व ठोस कारवाई झाली नाही तर आम आदमी पार्टी रस्त्यावर उतरेल. मंत्रालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल. तसेच जनतेच्या पैशाच्या संरक्षणासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करून न्यायालयीन लढा उभारला जाईल. या प्रकरणातील प्रत्येक जबाबदार अधिकाऱ्याला उत्तर द्यावे लागेल."**
>
> **– राम पाटील डोरले**
> **जिल्हाध्यक्ष वाशिम,आम आदमी पार्टी,**

राम पाटील डोरले यांनी आरोप केला आहे की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी संगनमताने हा निधी मुदत ठेवींमध्ये गुंतविला. यामध्ये शासनाच्या वित्त विभागाने १४ जून २०२१ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचाही दावा करण्यात आला आहे. निधी मुदत ठेवींमध्ये ठेवताना स्पर्धात्मक प्रक्रिया राबविण्यात आली का, कोणत्या निकषांवर बँकांची निवड करण्यात आली, तसेच कमी व्याजदराने निधी ठेवण्यामागे कोणते कारण होते, याचीही चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

डोरले यांनी याप्रकरणी केवळ प्रशासकीय चौकशी नव्हे तर आर्थिक गैरव्यवहाराच्या सर्व पैलूंची तपासणी करण्याची मागणी केली आहे. निधी गुंतवणुकीच्या प्रक्रियेत आर्थिक हितसंबंध, नियमबाह्य निर्णय अथवा अधिकारांचा गैरवापर झाला आहे का, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीमार्फत करण्यात यावी, चौकशी अहवाल १५ दिवसांत सादर करण्यात यावा, दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करून विभागीय कारवाई करण्यात यावी तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी ठाम मागणी राम पाटील डोरले यांनी केली आहे.

याशिवाय या निधी व्यवहाराचे महालेखापालांमार्फत विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांच्या कराच्या पैशातून व शासनाच्या विकासनिधीतून उभारल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असताना कोट्यवधी रुपयांचा निधी बँकांमध्ये अडकवून ठेवण्यात आल्याचा आरोप अत्यंत गंभीर असल्याचे सांगत राम पाटील डोरले यांनी या विषयावर शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे.

---

# मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची संधी ; ‘अमृत’तर्फे मोफत समुपदेशक प्रशिक्षण

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांमधील वाढता शैक्षणिक ताण, भावनिक समस्या, सोशल मीडियाचे व्यसन आणि मानसिक आरोग्याशी संबंधित आव्हाने लक्षात घेऊन महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे ‘अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम’ सुरू करण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ (MIMH), पुणे तांत्रिक भागीदार म्हणून कार्य करणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत शाळा व महाविद्यालयांमध्ये कार्य करण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशक तयार केले जाणार आहेत. प्रशिक्षणामध्ये विद्यार्थी समुपदेशन, बाल व किशोर मानसिक आरोग्य, संवाद कौशल्य, तणाव व्यवस्थापन, जीवनकौशल्य शिक्षण, आत्महत्या प्रतिबंध, सायबर सुरक्षा, पालक-शिक्षक समन्वय तसेच मानसिक आरोग्य जनजागृती आदी विषयांचा समावेश असेल.

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना शाळा, महाविद्यालय, स्वयंरोजगार, जीवनकौशल्य प्रशिक्षक व विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून कामाची संधी मिळणार आहे. प्रशिक्षणाचे स्वरूप हायब्रीड असून, यात १५ दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण (पुणे येथे), एक महिन्याची क्षेत्रीय नियुक्ती, ऑनलाइन तज्ज्ञ सत्रे व सहा महिन्यांचे मार्गदर्शन असेल. प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी निवास व भोजनाची व्यवस्था उमेदवारांना स्वतः करावी लागणार आहे.

**पात्रता व अर्ज प्रक्रिया:**

या प्रशिक्षणासाठी एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र किंवा एमएसडब्ल्यू पदवीधारक उमेदवार पात्र आहेत. अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांसाठी हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत आहे. पहिल्या बॅचसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १५ जून ते २२ जून २०२६ या कालावधीत सुरू राहील. पात्र उमेदवारांना ‘प्रथम येईल त्यास प्राधान्य’ या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल.

इच्छुक उमेदवारांनी अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. अधिक माहितीसाठी विभागीय व जिल्हा कार्यालय, अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. तसेच ७३९१०६५४७५ किंवा ९४०३२००६०६ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन अमृत संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

---

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियानांतर्गत दर्यापूरमध्ये दोन शेतकऱ्यांतील शेत रस्त्याचा वाद मिटला

## तहसीलदारांच्या मध्यस्थीने आपसी समजोता; न्यायालयीन फेऱ्या टळल्या

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : ग्रामीण भागातील शेत रस्त्यावरून उद्भवणारे वाद, तणाव आणि न्यायालयीन प्रकरणे कमी करण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियान'ला दर्यापूर तालुक्यात यश मिळाले आहे. तहसीलदार रवींद्र कानडजे यांच्या नेतृत्वात दोन शेतकऱ्यांमधील शेत रस्त्याचा जुना वाद आपसी समजोत्याने मिटवण्यात आला.

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान प्रभावीपणे राबवले जात आहे. या अभियानाचा उद्देश शेतकऱ्यांमधील वाद परस्पर संवाद आणि सामंजस्याच्या माध्यमातून सोडवणे हा आहे.

दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील शेतकरी मयूर महेंद्रकुमार वांदे यांनी त्यांच्या शेतालगत असलेल्या शेतकरी दादाराव मधुकर माहोकार यांनी शेत रस्त्यावर नाली खोदून मार्ग अडविल्याची तक्रार तहसीलदार रवींद्र कानडजे यांच्याकडे दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत महसूल प्रशासनाने संबंधित ठिकाणाची पाहणी करून सखोल तपासणी केली.

त्यानंतर तहसीलदार रवींद्र कानडजे यांनी दोन्ही पक्षांना तहसील कार्यालयात समोरासमोर बसवून चर्चा घडवून आणली. तलाठी व संबंधित महसूल कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत दोन्ही शेतकऱ्यांमध्ये परस्पर सामंजस्याने समजोता घडवून आणत शेत रस्त्याच्या वादाचे प्रकरण निकाली काढण्यात आले.



वाद मिटल्यावर दोन्ही शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात येऊन पुष्पगुच्छ देऊन तहसीलदारांचे स्वागत केले. परस्पर सामंजस्याने प्रश्न सोडविल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे आभार मानले.

प्रशासनाच्या या सकारात्मक पुढाकारामुळे ग्रामीण भागातील प्रलंबित शेत रस्त्यांचे प्रश्न न्यायालयात न जाता स्थानिक पातळीवरच मिटण्यास मदत होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण होत असून, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियान'चे शेतकरी वर्गातून स्वागत होत आहे.

तहसीलदार रवींद्र कानडजे म्हणाले की, "शेतकऱ्यांचे प्रश्न वेळेत आणि समंजस्याने मिटावेत यासाठी महसूल प्रशासन प्रयत्नशील आहे. न्यायालयीन लढाई टाळून आपसी संवादातून तोडगा काढणे हेच या अभियानाचे ब्रीद आहे." दर्यापूर तहसील कार्यालयात तहसीलदार रवींद्र कानडजे यांच्या उपस्थितीत दोन शेतकऱ्यांमधील शेत रस्त्याचा वाद मिटवण्यात आला. वाद मिटल्यावर दोन्ही शेतकऱ्यांनी तहसीलदारांचा सत्कार केला.

---

# कवी देवराव तेलगोटे राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराने सन्मानीत !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी :** आकोट जि. आकोला येथील प्रेम चारोळीकार , कवि देवराव दौलतराव तेलगोटे यांना संमेलनाध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक श्री. नागनाथ डोलारे (पनवेल.

जि. रायगड.) यांच्या हस्ते साहित्य क्षेत्रातील महत्वाचा आणि मानाचा पुरस्कार राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. 7 जून 2026 रविवारी वाई. जि. सातारा येथे गरवारे सभागृह, लोकमान्य टिळक ग्रंथालय वाई येथे 5 वे राज्यस्तरीय मिरग नक्षत्र कवी संमेलन आणि पुरस्कार 2026 सोहळ्याचे भव्य दिव्य आयोजन के.यस. आय. पब्लिकेशन महाराष्ट्र राज्य आणि विद्या निकेतन सामाजिक आणि शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त विधमाने करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष




मां. नागनाथ श्रीपती डोलारे, ( पनवेल. जि. रायगड.), उदघाटक मां. सौं. सुमनताई गजानन देसाई (मीरा भाईंदर, मुंबई ), प्रमुख मार्गदर्शक मा. श्रीकांत पाटील ( प्रसिद्ध कादंबरीकार, लेखक ) स्वागतध्यक्ष मा. श्री. शशिकांत कोचळे, ( विद्या निकेतन शैक्षणिक संस्था. कोंचळेवाडी. वाई.), ह. भ. प. सौं. विनाताई, वैभव महाडिक ( कळवणी. तस. खेड ) मा. श्री. बाळासाहेब देशमुख (अहिल्या नगर ) मा. श्री. तुकाराम शेट जेधे (संचालक.कृषी उत्पन्न बाजार समिती वाई.), प्रमुख उपस्तिथी मा. श्री. विलास धोंडीराम खरात ( साहित्यिक, लेखक.) मा. श्री. सचिन विष्णू वाघमारे, ( संपादक. लक्ष्य तारा न्यूज चॅनेल आटपाडी ) इत्यादी मान्यवर उपस्तिथ होते. तद नंतर कवी संमेलनाला सुरवात झाली कवि देवराव तेलगोटे यांच्या चंद्रावर असला तर असू दे,तुझ्या चारित्र्यावर नको डाग,कारण तू आहेस ग आज माझ्या या हृदयाचा एक भाग या चारोळी ने सभागृहात अक्षरशा धुमाकूळ घातला, रसिकानी तुफान टाळयांच्या गजरात स्वागत केले. उदघाटन पर कार्यक्रमाचे उत्कृष्ट आणि प्रभावशाली सूत्र संचालन, मा. विद्या थोरात काळे ( विजू ) ( लेखिका, कवयित्री निवेदिका.) मुंबई यांनी केले तर कवी संमेलनाचे बहारदार सूत्र संचालन मा.

---

# महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्वच्छता अभियान व वृक्षारोपण उत्साहात"

**दैनिक युवक आधार**

**गंगाधर संजय कदम अर्धापूर ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी नांदेड येथे राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी स्वच्छता व वृक्षारोपणाच्या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या अभियानांतर्गत रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवून प्लास्टिक कचऱ्याचे संकलन केले. त्यानंतर परिसरात वृक्षांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करण्यात आला.कार्यक्रमास शिक्षण संचालक डॉ. एस. डी. मोरे, प्राचार्य डॉ. पी. ए. सोनवणे, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. देविकांत






देशमुख, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. के. आर. उदासी, प्राध्यापक डॉ. नांदेडकर, प्राध्यापक सि.एस. देसाई,


प्राध्यापक डॉ. मनोजकुमार देसाई, प्राध्यापक पि.यु. ढोणे, प्राध्यापक डि.एस. एंगडे, प्राध्यापक पि. जे.कदम, प्राध्यापक वाय.एम.नादरे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण संचालक डॉ. एस. डी. मोरे यांनी पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून वृक्षारोपण बरोबरच वृक्षसंवर्धनासाठीही विद्यार्थ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम सहाय्यक श्री. जी. एस. कदम, श्री. आर. एन. मोरे, श्री. के. व्ही. कदम, श्री. सुरज मोरे, श्री. संगम जाधव, व्यंकट जाधव, शंकर कदम, बाबुराव करेवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती घडवून आणणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

---

# अकोला तालुक्याची राज्यात नवी ओळख ; घरगणना पूर्ण करणारा जिल्ह्यातील पहिला तालुका, तहसीलदार कुणाल झाल्टे यांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून गौरव

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका अकोला, दि. ९ :** जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे कार्य अकोला जिल्ह्यात सर्वप्रथम पूर्ण करून अकोला तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते अकोलाचे तहसीलदार कुणाल झाल्टे यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.जनगणना २०२७



अंतर्गत पहिल्या टप्प्यात घरगणना आणि गृहसूचीकरणाचे महत्त्वपूर्ण काम जिल्हाभर सुरू होते. या मोहिमेत अकोला तालुक्याने उत्कृष्ट नियोजन, प्रभावी समन्वय आणि कर्मचारी वर्गाच्या मेहनतीच्या जोरावर निर्धारित मुदतपूर्वीच सर्व ३७६ गणना गटांचे घरगणनेचे कार्य यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यामुळे अकोला तालुका जिल्ह्यात घरगणना पूर्ण करणारा पहिला तालुका ठरला आहे.या यशाबद्दल जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी तहसीलदार कुणाल झाल्टे तसेच जनगणना कार्यात सहभागी संपूर्ण अधिकारी व कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले. जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, अचूक आणि वेळेत काम पूर्ण केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच जनगणना २०२७ च्या पुढील टप्प्यांमध्येही याच उत्साहाने आणि जबाबदारीने कार्य करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्यासह जनगणना विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. अकोला तालुक्याच्या या यशामुळे जिल्ह्यातील इतर तालुक्यांसाठीही प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले असून, आगामी जनगणना प्रक्रियेस अधिक गती मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे

साने गुरुजी यांची आज ७६ वी पुण्यतिथी.साने गुरुजी यांनी मुंबईत ११ जून १९५० रोजी के.ई.एम. रुग्णालयात २१ झोपेच्या गोळ्याचे अतिसेवन करून आत्महत्या केली. माझी आई गांधीवादी कै.तरुलता कृष्णकांत राजेशिर्के- पानसरे ही साने गुरुजींच्या साहित्यावर प्रेम करणारी होती.तिच्या अप्रकाशित साहित्य व कविता यांचा खजिना माझ्याकडे आहे.माझी आई स्वर्गात गेल्यानंतर तिची कवितांची वही माझ्या वाचनात आली.त्यामध्ये तिने असे लिहिलेले होते की ज्या दिवशी साने गुरुजींनी आत्महत्या केली होती.त्याच दिवशी तिची आई म्हणजे माझी आजी कॅन्सरच्या आजाराने तिला सोडून गेली होती. याबाबत लिहिताना ती म्हणते की दोघेही बहिण भाऊ स्वर्गात एकमेकांना भेटले असतील.काय ही तिची भाबडी कल्पना.मी ही तरुणपणी वैफल्यग्रस्त जीवन जगत असताना तासनतास स्वतःला एका खोलीत कोंडून घेत असे पण ती मला कधी रागावली नाही.एवढच म्हणायची तू साने गुरुजींसारखी आत्महत्या केलेली मला आवडणार नाही.मग मी त्यापासून परावृत्त होत असे.पण मी माझ्या एकुलती एक मुलगी धरती.हिला समजावू शकलो नाही.ती वैफल्यग्रस्त जीवन जगत असताना मला नेहमी म्हणायची पप्पा मला आत्महत्या करावीशी वाटते.मी तिला नेहमी म्हणायचो की तूला मरण आले तरी ठिक. त्यातून तूला अपंगत्व आले तर तू काय करशील.मी तिला माझ्या आईने मला नेहमी दिलेला उपदेश सांगत असे.पण तिने माझे ऐकले नाही.आणि तिने मोठे धाडस केले. आणि ती मला या दुनियेतून सोडून गेली.आणि आयुष्यभराचे दु:ख आम्हा उभयतांना पती पत्नीना देऊन गेली.गुरुजींची आत्महत्येच्या निर्णयामागे वैयक्तिक दु:ख आणि राजकीय सामाजिक निराशा ही कारणे असली तरी गांधीहत्येमुळे त्यांना मानसिक धक्का बसला होता.आणि त्यानंतर उसळलेल्या दंगलीची चिंता त्यांना होती. माझी गांधीवादी आईनेही महात्मा गांधी यांची हत्या झाल्यानंतर १० ते १२ दिवस अन्नपाणी सोडले होते. गांधीची हत्या ज्या दिवशी झाली तो शुक्रवार होता.हा दिवस मरेपर्यंत तिने उपवास केला.तीची ईच्छा होती की मला शुक्रवारी मरण यावे,ती १७ ऑगस्ट १९८९ रोजी शुक्रवार होता.या दिवशी हृदयविकाराच्या झटक्याने मला सोडून गेली, माझ्या आईने गांधीचा शुक्रवार तर माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा बुधवार मरेपर्यंत उपवास केला.साने गुरुजी या नावाशी माझा नेहमी संबंध राहिला आहे.माझी पानसरे नावाची बिल्डिंग चिंचपोकळी येथील आर्थररोड नाक्यावरील साने गुरुजी मार्गावर आहे.त्यामुळे वयाच्या ३३ वर्षांपर्यंत घरचा पत्ता लिहिताना मी साने गुरुजी मार्ग असे लिहित असे.माझे प्राथमिक शिक्षण आर्थररोड नाक्यावरील मुंबई महानगर पालिकेच्या साने गुरुजी प्राथमिक शाळेत झाले याचा उल्लेख येथे करावसा वाटतो.आता जाणून घेऊ या साने गुरुजी यांची माहिती.साने गुरुजी यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड येथे झाला.त्यांचे नाव पांडुरंग सदाशिव साने.आईचे नाव यशोदाबाई तर वडीलांचे नाव सदाशिव.साने गुरुजींची कर्मभूमी खान्देशची अमळनेर येथील.तेथील तत्वज्ञान मंदिर आणि प्रताप विद्यालयात त्यांनी अध्यापन केले.त्यांनी न्यू पूना कॉलेजमधून मराठी आणि संस्कृत विषयात एम.ए.पदवी पर्यंत शिक्षण घेतले होते.ते एक महाराष्ट्रातील एक थोर स्वातंत्र्यसेनानी, संवेदनशील साहित्यिक,शिक्षक आणि समाजसुधारक होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सहभाग होता.१९३० घ्या सविनय कायदे भंग चळवळीत त्यांनी भाग घेतला.त्यासाठी त्यांना अनेक वर्ष तुरुंगावास भोगावा लागला.तुरुंगात असताना त्यांनी बहुतांश साहित्य लिहिले.धडपडणारी मुले, भारतीय संस्कृती,गोड गोष्टी,सुंदर पत्रे हि त्यांची प्रमुख पुस्तके.त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली.त्यातील बहुतांश पुस्तके मुलांसाठी आहेत.श्यामची आई सर्वात प्रसिद्ध व लोकप्रिय पुस्तक.संपादक, नाटककार,वक्ते, चित्रपट निर्माते आचार्य अत्रे यांनी त्यांच्यावर श्यामची आई चित्रपट बनविला.ज्याला१९५४ साली राष्ट्रीय पुरस्कारांच्या पहिल्या यादीत राष्ट्रपतींचे सुवर्ण पदक मिळाले. गुरुजींनी आईच्या स्मृती श्यामची आई मध्ये शब्दबद्ध केल्या आहेत. श्यामच्या आई मधील श्याम म्हणजे स्वतः साने गुरुजी होय.गुरुजींवर त्यांच्या आईच्या शिकविणूचा व संस्कारांचा मोठा प्रभाव होता. तरुणांमध्ये देशभक्ती आणि समाजसेवा रुजवावी यासाठी त्यांनी राष्ट्रसेवा दलाची स्थापना केली. आंतरभारती चळवळ सुरु केली. समतावादी विचार ते अस्पृश्यता निवारण आणि सर्वधर्मसमभावचे ते कट्टर समर्थक होते.त्यांनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी आणि मानवी मुल्यांसाठी सर्मपित केले.त्यांचा पत्री हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. या काव्यसंग्रहातील खरा तो एकची धर्म.जगाला प्रेम अर्पावे.आजही हि कविता महाराष्ट्रातील शाळांमध्ये प्रार्थना म्हणून गायली जाते.

आजच्या मोबाईलच्या युगात प्रत्येक आईवडीलांनी वेळ काढून लहान मुलांना साने गुरुजींचे साहित्य वाचून दाखवली पाहिजे असे मनोमन वाटते.

गुरुजींना स्मृती दिनानिमित्त भावपुर्ण आदरांजली अर्पण करतो.

**नासिकेत कृष्णकांत पानसरे**
**ज्येष्ठ पत्रकार,**
**मुंबई**

## महसूल मंत्री बावनकुळे यांचा पत्रकार संघाकडून गौरव; 'शासन आपल्या दारी' ची घेतली दखल

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे प्रतिनिधी**

**मुंबई:**महसूल प्रशासन अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख केल्याबद्दल महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मराठी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनात मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.




महाअधिवेशनाच्या मंचावर झालेल्या या सोहळ्यात बावनकुळे यांना पुष्पहार घालून सन्मानित करण्यात आले. संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना मानपत्र अर्पण केले. राज्यभरातून आले पत्रकार प्रतिनिधी या सोहळ्यास उपस्थित होते.

बावनकुळे यांच्या कार्यकाळातील निर्णयांचा मानपत्रात विशेष उल्लेख करण्यात आला. 7/12 उतारा आणि ई-फेरफार आता ऑनलाइन उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांच्या तहसील कार्यालयाच्या फेऱ्या वाचल्या आहेत. ही महसूल विभागातील मोठी डिजिटल क्रांती मानली जात आहे.

महसूल न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असले दावे निकाली काढण्याचा विक्रमही त्यांच्या काळात झाला. त्यामुळे न्याय मिळण्यास विलंब होणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय म्हणजे गायरान आणि इनाम जमिनींच्या प्रश्नांची सोडवणूक. या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर मालकी हक्क मिळाला. तसेच अतिवृष्टी, अवकाळी पाऊस यांसारख्या नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना वेळेत मदत पोहोचवण्याची यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आली.

'शासन आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणून शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कामही त्यांनी केले. पत्रकार संघाने म्हटले की, बावनकुळे यांनी महसूल विभागाला 'फाइलमधून मैदानात' आणले. त्यांच्या पारदर्शक कारभारामुळे सामान्य माणसाचा शासन यंत्रणेवरचा विश्वास वाढला आहे.

## पारंपरिक 'लगोरी' खेळाला मिळणार राजाश्रय; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोठे आश्वासन!

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : भारताच्या समृद्ध क्रीडा परंपरेचा वारसा असलेला आणि कधीकाळी गल्लोगल्ली खेळला जाणारा 'लगोरी' हा पारंपरिक खेळ आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भरारी घेण्यास सज्ज झाला आहे. लगोरी खेळाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्याला अधिकृत क्रीडा प्रकार म्हणून मोठी ओळख मिळवून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे महत्त्वपूर्ण आश्वासन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'लगोरी स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया'च्या वतीने नुकतीच मुख्यमंत्री महोदयांची सदिच्छा भेट घेण्यात आली, या बैठकीत खेळाच्या भविष्यातील वाटचालीवर सविस्तर चर्चा झाली.

**बैठकीतील प्रमुख उपस्थिती:**

या महत्त्वपूर्ण बैठकीला लगोरी स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते, ज्यामध्ये:

> **"भारतीय पारंपरिक खेळांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. लगोरी खेळाला राष्ट्रीय स्तरावर मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी आणि विविध क्रीडा स्पर्धांमध्ये त्याचा समावेश करण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक पावले उचलेल."**
>
> **— मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

श्री. तुषार जाधव (महासचिव, लगोरी स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया),डॉ. हेमंत पयेर (सदस्य, फेडरेशन),श्री. राजेंद्र पाटील (चेअरमन, तांत्रिक समिती) हे उपस्थित होते

**फेडरेशनच्या प्रमुख मागण्या आणि उपक्रम:**

शिष्टमंडळाने मुख्यमंत्री महोदयांसमोर लगोरी या मातीतील खेळाला देश-विदेशात पोहोचवण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. तसेच खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी खालील महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये 'लगोरी'चा

**नॅशनल गेम्स (National Games),स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया (SGFI),असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (AIU) समावेश करण्याची विनंती केली:**

**सन्मानचिन्ह आणि 'लगोरी सेट' भेट:**

बैठकीच्या शेवटी, लगोरी स्पोर्ट्स फेडरेशनच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. याप्रसंगी खेळाची आठवण आणि प्रतीक म्हणून एक आकर्षक 'लगोरी सेट' त्यांना भेट देण्यात आला.

**थोडक्यात काय तर...**

ही भेट केवळ सदिच्छा भेट नसून, 'लगोरी' या मराठमोळ्या आणि भारतीय खेळाला जागतिक पातळीवर एक नवी ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे.

## अन्न भेसळीचा सुळसुळाट, पण पहारेकरीच कमी!

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर** : देशात अन्न भेसळ हा केवळ ग्राहक फसवणुकीचा विषय राहिलेला नाही, तर तो थेट जनतेच्या आरोग्यावर घाला घालणारा गंभीर प्रश्न बनला आहे. दूध, तूप, मसाले, मिठाई, तेल, फळे आणि भाजीपाला यापासून ते पॅकेजबंद खाद्यपदार्थांपर्यंत भेसळीचे आरोप सातत्याने समोर येत आहेत . मात्र या विरोधात कारवाई करणारी यंत्रणाच मनुष्यबळाच्या कमतरतेने ग्रासलेली असल्याचे चित्र समोर आले आहे.

राज्यसभेत सादर झालेल्या माहितीनुसार, देशभरात मंजूर असलेल्या 4208 Food Safety Officer पदांपैकी केवळ 2997 अधिकारी कार्यरत आहेत. म्हणजे तब्बल 1211 पदे रिक्त आहेत. FSSAI मध्येही 822 मंजूर पदांपैकी 320 पदे रिक्त असल्याचे समोर आले आहे.

### दहा लाख लोकांच्या आरोग्याची जबाबदारी फक्त दोन अधिकाऱ्यांवर? मग भेसळ रोखणार कोण?

प्रश्न असा आहे की, 140 कोटी लोकसंख्या असलेल्या देशात मोजक्या अधिकाऱ्यांच्या खांद्यावर अन्न सुरक्षेची जबाबदारी टाकून सरकार नेमके कोणते चमत्कार अपेक्षित करत आहे?

एका अधिकाऱ्याने किती दुकाने तपासायची, किती कारखाने तपासायचे, किती नमुने घ्यायचे आणि किती कारवाया करायच्या? लाखो नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेले अधिकारीच नसतील तर भेसळ माफियांना मोकळे रान मिळणार नाही तर काय?

दरवेळी भेसळयुक्त पदार्थ सापडले की छापे, कारवाया आणि मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. पण प्रत्यक्षात तपासणी यंत्रणेतच मोठी पोकळी असेल तर ही लढाई कागदावरच राहणार. आज परिस्थिती अशी आहे की, अनेक भागांत दहा लाख लोकसंख्येमागे अवघे दोन-तीन अन्न सुरक्षा अधिकारी उपलब्ध आहेत.

जनतेने कोणावर विश्वास ठेवायचा? बाजारातील पदार्थांवर, की त्यांची तपासणी करणाऱ्या अपुऱ्या यंत्रणेवर?

अन्न भेसळीमुळे कर्करोग, मूत्रपिंड विकार, यकृताचे आजार आणि इतर गंभीर आरोग्य समस्या वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अशा वेळी रिक्त पदे वर्षानुवर्षे भरली जात नसतील, तर ही केवळ प्रशासकीय चूक नसून जनतेच्या आरोग्याशी केलेली गंभीर बेपर्वाई मानली पाहिजे.

सरकार, FSSAI आणि राज्य प्रशासनाने आता एकमेकांकडे बोट दाखवण्यापेक्षा रिक्त पदे तातडीने भरून अन्न सुरक्षेची यंत्रणा सक्षम करणे गरजेचे आहे. अन्यथा "अन्न भेसळमुक्त भारत" ही घोषणा फक्त जाहिरातींमध्येच दिसेल आणि सामान्य नागरिक मात्र रोजच्या जेवणात नेमके काय खात आहे, याची खात्रीही देऊ शकणार नाही.भेसळीपेक्षा भयानक गोष्ट म्हणजे भेसळ रोखणारी यंत्रणाच अपुरी असणे."

## विदर्भाच्या लोककलेचा गौरव; शाहीर श्रीकांत नागदेवे 'कलारत्न-कलाभूषण' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** : लाखनी तालुक्यातील सोमलवाडा येथील खडी गमतीचे सुप्रसिद्ध कलावंत तथा शाहीर श्रीकांत अंबादासजी नागदेवे यांना त्यांच्या लोककला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत विदर्भ स्तरीय 'कलारत्न-कलाभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे सोमलवाडा गावासह संपूर्ण लाखनी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. 9 जून 2026 रोजी सम्यक बुद्ध विहार, पहेला येथे झालेल्या या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

सदर पुरस्कार माजी खासदार खुशाल बोपचे, चित्रपट अभिनेते अश्विनकुमार वघाले, अभिनेत्री चैताली भस्मे तसेच मुख्य संपादक दशरथ



सुरडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शाहीर नागदेवे यांच्या लोककलेच्या जतन व संवर्धनासाठीच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

खडी गमतीच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, जनजागृती आणि ग्रामीण संस्कृतीचे जतन करण्यासाठी शाहीर श्रीकांत नागदेवे यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असून, त्यांच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे."लोककलेच्या मंचावरून समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या शाहिराला मिळालेला हा सन्मान विदर्भातील लोककलावंतांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे," अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## प्रतिष्ठेचा 'अधिक मास' (धोंडा) आणि शाही विवाह सोहळे : दिखाव्याच्या स्पर्धेत मोडलेय सर्वसामान्यांचे आर्थिक कंबरडे!

भारतीय संस्कृती ही साधेपणा, संस्कार आणि कौटुंबिक मूल्यांसाठी ओळखली जाते. मात्र, गेल्या काही वर्षांत सण-उत्सव आणि विवाहाच्या मूळ संकल्पनेत झालेला बदल अत्यंत चिंताजनक आहे. अधिक मास (धोंडा) असो किंवा भव्य शाही विवाह सोहळे— आज सर्वत्र 'प्रतिष्ठेची चढाओढ' सुरू आहे. या 'इव्हेंट' संस्कृतीमुळे सामान्य शेतकरी आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना न पेलवणाऱ्या आर्थिक ओझ्याचा सामना करावा लागत आहे.

**• वास्तवाचे विदारक चित्र •**

आज सोशल मीडियावर सुरू असलेला धोंड्याचा 'झगमगाट' आणि लग्नातील प्री-वेडिंग शूट, अवाढव्य शाही विवाह सोहळे, हळदी-मेहंदी-संगीत यांसारख्या कार्यक्रमांचा प्रचंड खर्च, डीजेचा अफाट आवाज आणि नको तितकी रोषणाई हे केवळ उत्सव राहिलेले नाहीत, तर ती एक 'सामाजिक स्पर्धा' बनली आहे. फेसबुक, व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्रामवर होणारे हे प्रदर्शन तरुण पिढीच्या अपेक्षांचे नवनवीन आणि चुकीचे मापदंड ठरवत आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, या आभासी दुनियेतील दिखाव्याचा फटका थेट सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलींच्या पित्यांना बसत आहे. आपली प्रतिष्ठा टिकवण्याच्या नादात अनेक कुटुंबे कर्जबाजारी होत आहेत, हे वास्तव ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक कणा मोडणारे आहे.

**• कायदेशीर आणि सामाजिक भाष्य •**



वास्तवाचे दोन पैलू

कायद्याच्या भाषेत पाहता, 'हुंडा प्रतिबंधक कायदा' कागदावर असला तरी, सणासुदीच्या किंवा लग्नाच्या निमित्ताने होणारी अवास्तव उधळपट्टी ही कायद्याच्या चौकटीतून काढलेली एक 'पळवाट' ठरत आहे. समाजात निर्माण झालेली ही आर्थिक विषमता केवळ दरीच रुंदावत नाही, तर यामुळेच कौटुंबिक तणाव निर्माण होऊन घटस्फोटांची प्रकरणेही वाढत आहेत. अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याखाली दबलेली कुटुंबे आज घुसमटत आहेत, जो सामाजिक शांततेसाठी एक अदृश्य धोका आहे.

**• संस्कृतीचा ऱ्हास की विकास? •**

धोंड्याचा खरा अर्थ दानधर्म आणि सात्विक स्नेह असा आहे, तर विवाह म्हणजे दोन कुटुंबांचे मिलन. मात्र, आज दागिन्यांच्या प्रदर्शनातून आणि महागड्या इव्हेंटच्या माध्यमातून प्रेम मोजले जात आहे. सणांचे रूपांतर जेव्हा केवळ 'प्रदर्शनात' होते, तेव्हा त्यातील पावित्र्य आणि संस्कार मागे पडतात. 'दिखाव्या'पेक्षा 'माणुसकी' आणि 'साधेपणा' या मूल्यांचे पुनरुज्जीवन करणे, हीच काळाची गरज आहे.

**• निष्कर्ष: काळाची गरज 'विवेकाची' •**

धोंडा सण किंवा शाही विवाह सोहळे आनंदाने साजरे करा, पण ते 'प्रतिष्ठेच्या' तराजूत न मोजता 'विवेकाच्या' कसोटीवर तपासा. श्रीमंतीचे प्रदर्शन करून स्वतःला कर्जाच्या खाईत लोटणे म्हणजे सुखी संसाराचा पाया ढासळणे होय. समाज म्हणून आपण आताच जागे झाले पाहिजे. संस्कृती टिकवा, पण प्रदर्शनाचा हा 'डोंगर' उभा करून स्वतःचे आयुष्य उध्वस्त करू नका. साधेपणा हेच आजच्या काळातील सर्वात मोठे वैभव आहे, हे आता समाजाला उमजण्याची वेळ आली आहे.

**- योगेश रामचंद्र पालोदकर**
**जिल्हा प्रतिनिधी, दैनिक युवक आधार.**
**छत्रपती संभाजीनगर**
**संपर्क: [ ९८९०४४२३०३ ]**

# कोकणची कैफियत मांडण्यासाठी शनिवारी दादरमध्ये जाहीर मेळावा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : सर्वाधिक काजू उत्पादन कोकणात असताना काजू बाजारपेठ मात्र पश्चिम महाराष्ट्रात, सागर किनाऱ्याच्या सानिध्यामुळे सर्वाधिक मासेमारी होत असताना मत्स्य विद्यापीठ मात्र नागपूरला दुसरीकडे प्रदूषणामुळे इटलीने बंद केलेली रसायन कंपनी मात्र कोकणात आणि आता एकाचवेळी तीन अणुभट्ट्या उभारण्याची घोषणा... कोकण जणू वसाहतीचा प्रदेश आहे, असेच सरकारचे धोरण असून या पार्श्वभूमीवर कोकणी जनतेची भूमिका ठरविण्यासाठी जनता दल सेक्युलर महाराष्ट्र पक्ष, कोकण जनविकास समिती आणि मूलभूत अधिकार संघर्ष समिती यांच्या वतीने शनिवारी १३ जून रोजी *कोकणची कैफियत* या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दादर पूर्व येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या प्रा. सुरेंद्र गावस्कर सभागृहात सायंकाळी पाच ते आठ या वेळेत हा परिसंवाद होणार आहे. राज्य सरकारने अलीकडेच काजू बाजार उभारण्याचा निर्णय घेतला असून यासाठी चंदगड तालुक्यात ४० एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. वास्तवात काजूची लागवड आणि उत्पादन सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक आहे. त्यामुळे ही बाजारपेठ, काजू निर्यात केंद्र, गोदाम, सेंटर ऑफ एक्सलन्स व अन्य सुविधा कोकणातच व्हाव्यात अशी जनतेची मागणी आहे. सागर किनारा नजीक असल्यामुळे कोकणातच मोठ्या प्रमाणावर मासेमारी होत असताना मत्स्य विज्ञान विद्यापीठ मात्र ८०० किलोमीटर दूर नागपूर येथे सुरू करण्यात आले आहे. दुसरीकडे स्वस्त आणि स्वच्छ सौर ऊर्जेमुळे सगळे जग अणू आणि औष्णिक ऊर्जेकडे पाठ फिरवत असताना नुकतेच राज्य सरकारने कोकणातील देवगड, आदी तीन ठिकाणी अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. यापूर्वी जैतापूर येथेही अणुऊर्जा प्रकल्पाची घोषणा झाली होती व तो प्रश्न प्रलंबित आहे. या प्रकल्पाला कोकणातील जनतेने प्रचंड विरोध केला होता. त्यामुळे अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याची कल्पना सरकारने मागे घ्यावी व त्याऐवजी सौर ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्य द्यावे. सौर ऊर्जा प्रकल्प लवकर पूर्ण होतील व त्यातून निर्माण होणाऱ्या विजेचा दरही प्रति युनिट अडीच ते साडेतीन रुपये (२४ तास पडणार आहे) तुलनेने अणुऊर्जा प्रकल्प आज पूर्ण झाला तरी त्याचा प्रति युनिट दर दहा ते बारा रुपये पडून ही महागडी वीज कोण विकत घेणार, असा प्रश्न भविष्यात निर्माण होणार आहे. या विषयावर अणूऊर्जा अभ्यासक आणि ज्येष्ठ सामजिक कार्यकर्ते डॉ. मंगेश सावंत मार्गदर्शन करणार आहेत.

असाच प्रकार "फी पास" या कधीही नष्ट न होणाऱ्या अत्यंत विषारी रसायनांचे उत्पादन करणाऱ्या आणि त्यामुळे इटलीने बंद केलेल्या प्रकल्पाला कोकणात लोटे येथे परवानगी देऊन करण्यात आला आहे. घातक अशी ही रसायने गंभीर आजारांना कारणीभूत ठरत असल्यामुळे इटलीने त्यावर बंदी घातली होती. पण तीच फॅक्टरी लोटे येथे सुरू करण्यात आली आहे. त्या निर्णयाच्या विरोधात खुद्द इटलीतील महिलाही भारतातील महिलांसाठी निदर्शने करीत आहेत. याविषयी केमिकल इंजिनिअरिंगचे प्राध्यापक असलेले प्रा. सुरेश रानडे बोलतील. याचबरोबर जनता दल सेक्युलर महाराष्ट्र पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रभाकर नारकर आणि ज्येष्ठ सामजिक कार्यकर्ते प्रकाश लव्हेकर परिसंवादात आपले विचार मांडतील, अशी माहिती जनता दलाचे संजय परब, अँड. प्रशांत गायकवाड, कोकण जनविकास समितीचे सुरेश रासम, जगदीश नलावडे तसेच मूलभूत अधिकार संघर्ष समितीचे दिनेश राणे यांनी दिली आहे.

# महावितरणचा निष्काळजीपणा ! पनवेलच्या टपाल नाका येथे धोकादायक उघड्या विद्युत वाहिन्या !

## दुर्घटना झाल्यास अधिकाऱ्यांवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करण्याची गरज !

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल शहरातील अत्यंत गजबजलेल्या टपाल नाका परिसरात महावितरणच्या मुख्य विद्युत वाहिन्या आणि डीपी () अत्यंत घातक अवस्थेत उघड्यावर पडल्याचे समोर आले आहे. यामुळे येथे कधीही मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, जर कोणतीही दुर्दैवी घटना किंवा जीवितहानी घडल्यास संबंधित महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता, 2023 च्या कलम 105 (पूर्वीचे आयपीसी कलम 304 - सदोष मनुष्यवध) अंतर्गत थेट गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी तीव्र मागणी पनवेलमधील स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.



पनवेल शहराला देखणे आणि सुरक्षित करण्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करून भूमिगत वीज वाहिन्या टाकण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. मात्र, टपाल नाका परिसरातील सद्यस्थिती पाहता हा प्रकल्प केवळ कागदावरच राहिला आहे की काय, असा प्रश्न पडत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही वीजवाहिन्या उघड्याच कशा, असा सवाल उपस्थित करत या संपूर्ण भूमिगत वाहिनी जोडणीच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या कामाची वरिष्ठ पातळीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. कायदेशीर बाजू आणि तरतुदीविद्युत कायद्यानुसार नागरिकांच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी महावितरण कंपनीची आहे. कायदेतज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारे उघड्या तारांमुळे होणारा अपघात हा निव्वळ अपघाती नसून तो प्रशासकीय निष्काळजीपणाचा भाग मानला जातो.

अशा प्रकरणात निष्काळजीपणामुळे मृत्यू ओढवल्यास कलम 106 (निष्काळजीपणामुळे मृत्यू) किंवा थेट कलम 105 (माहिती असूनही हलगर्जीपणा करणे, ज्यामुळे मृत्यू होऊ शकतो - सदोष मनुष्यवध) अंतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो. उच्च न्यायालयाचे निर्देश: यापूर्वी विविध जनहित याचिकांवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी उघड्या तारा किंवा डीपी बॉक्समुळे दुर्घटना घडल्यास संबंधित वीज वितरण कंपनीचे अधिकारी थेट जबाबदार धरले जातील.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने उघड्या पडलेल्या या वायरींमध्ये पाणी शिरून संपूर्ण परिसरात 'इलेक्ट्रिक शॉक' (करंट) पसरण्याचा प्रचंड धोका निर्माण झाला आहे.

टपाल नाका हा शहरातील मुख्य चौक असून येथून हजारो नागरिक, शाळकरी मुले आणि वाहनांची सतत वर्दळ असते. एखादा मोठा अनर्थ घडण्यापूर्वी महावितरण यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

"आम्ही वारंवार तक्रार करूनही अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत. जर येथे कोणाचाही वीज लागून मृत्यू झाला,

तर आम्ही मृतदेह ताब्यात न घेता थेट संबंधित अभियंत्याला अटक होईपर्यंत महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करू," असा संतप्त इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे. याबाबत महावितरण विभाग पनवेल यांच्याशी संपर्क केला असता लवकरच काम करून घेतले जाईल असे सांगण्यात आले.

# ११ वर्षांनंतर 'देऊळ बंद २'ची ब्लॉकबस्टर एन्ट्री; प्रदर्शित होताच प्रेक्षक झाले स्वामीमय

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर:** २०१३ साली प्रदर्शित झालेल्या सुपरहिट 'देऊळ बंद' या चित्रपटाने मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत बॉक्स ऑफिसवर मोठा गाजावाजा केला होता. श्रद्धा विरुद्ध विज्ञान यांचा संगम असलेल्या या चित्रपटाने त्या काळात प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. तब्बल ११ वर्षांनंतर प्रदर्शित झालेल्या 'देऊळ बंद २' या बहुचर्चित सिक्वेलनेही प्रदर्शित होताच मराठी चित्रपटसृष्टीत ब्लॉकबस्टर एन्ट्री करत प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळवला आहे.




राज्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये पहिल्या दिवसापासून शो हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, नागपूर, जळगाव, विदर्भ आणि मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात 'देऊळ बंद २'ची प्रचंड क्रेझ पाहायला मिळत आहे. या भागातील अनेक थिएटरचे सर्व शो हाऊसफुल्ल होत असून, तिकीट खिडक्यांवर गर्दी होत आहे. चित्रपटाने पहिल्याच दिवशी ३.०५ करोडची धमाकेदार कमाई करून नवा इतिहास रचला आणि फक्त १९ दिवसात ७० कोटींपेक्षा जास्त कमाईचा विक्रम करत घोडदौड सुरू आहे.

सोशल मीडियावरही 'देऊळ बंद २'ची जोरदार चर्चा रंगली असून, प्रेक्षकांनी चित्रपटातील संवाद, दमदार कथानक, भावनिक प्रसंग, संगीत आणि कलाकारांच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले असून महाराष्ट्रातील छोट्या गावांपासून ते मोठ्या शहरांमधील मल्टिप्लेक्सपर्यंत सर्वत्र प्रेक्षकांना आकर्षित केले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांपासून ते शहरी भागातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत समाजातील सर्व स्तरांतील प्रेक्षक सहकुटुंब या चित्रपटाला गर्दी करत आहेत. वाढत्या मागणीमुळे राज्यभरातील सिंगल स्क्रीन आणि मल्टिप्लेक्समध्ये चित्रपटासाठी 'हाउसफुल्ल'चे बोर्ड झळकत असून, तिसऱ्या आठवड्यातही बॉक्स ऑफिसवर चित्रपटाची कामगिरी भक्कम सुरू आहे.

वटवृक्ष इंटरटेनमेंट निर्मित "देऊळ बंद २" चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून या भव्य चित्रपटाची निर्मिती कैलास वाणी, सौ. जयश्री वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. चित्रपटात मोहन जोशी आणि स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत असून महेश मांजरेकर, सविता मालपेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भुतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, देवेंद्र गायकवाड, रमेश परदेशी, केदार सोमण, अतुल कुडले, मुकुंद वसुले आणि प्रविण तरडे महत्त्वपूर्ण भूमिकेत आहेत.

आज नागपूर येथे जगप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या विशेष उपस्थितीतीत पार पडलेल्या पत्रकार परिषदेत निर्माते कैलाश वाणी, लेखक-दिग्दर्शक प्रविण विठ्ठल तरडे, नागपूर येथील अभिनेते मुकुंद वसूले व तंत्रज्ञ संकेत धोटकर तसेच लीड मीडिया पीआर आणि मार्केटिंगचे कुशल कोंडे, अनुप गोरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उत्कृष्ट छायांकन, प्रभावी पार्श्वसंगीत आणि भव्य सादरीकरणामुळे चित्रपट अधिक उठावदार ठरला आहे. प्रदर्शित होताच मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे 'देऊळ बंद २' हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील यंदाचा सर्वाधिक चर्चेत असलेला आणि ब्लॉकबस्टर चित्रपट ठरला असल्याची चर्चा चित्रपट वर्तुळात सुरू झाली आहे.

**तर्री पोहे खाऊन साजरे केले यश**

मराठी चित्रपटसृष्टीतील गाजत असलेला 'देऊळ बंद 2 : आता परीक्षा देवाची...' या चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक प्रविण विठ्ठल तरडे आणि त्यांच्या संपूर्ण चमूने आज सकाळी नागपूरच्या खाद्यसंस्कृतीची खास ओळख असलेल्या प्रसिद्ध तर्री पोह्यांचा आस्वाद घेत चित्रपटाच्या घवघवीत यशाचा आनंद साजरा केला. नागपूर दौऱ्यावर आलेल्या चित्रपटाच्या टीमने स्थानिक नागरिकांशी संवाद साधत तर्री पोह्यांची चव अनुभवली.

# शिळफाट्याच्या झेप्टो डार्क स्टोअरमध्ये सडके पदार्थ?

## नागरिकांच्या जीवाशी खेळ; FDA आयुक्त मुंढे यांच्याकडे कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** :डिलिव्हरीच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे का? शिळफाटा येथील झेप्टो डार्क स्टोअरमधून वास मारणारे, निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ विकले जात असल्याचा धक्कादायक आरोप करत समाजसेवक विनोद शनिवार वास्कर यांनी थेट FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे धाव घेतली आहे.

**काय आहे प्रकरण?**

शिळ-दिवा मार्गावर, शिळ गावच्या तुळजाभवानी मंदिराजवळ झेप्टोचे डार्क स्टोअर सुरू आहे. येथून डिलिव्हरी बॉयमार्फत घरपोच खाद्यपदार्थ दिले जातात. पण या दुकानाला FSSAI परवाना, आरोग्य परवाना, अग्निशमन परवाना किंवा महापालिका परवानगी आहे का, याची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. दुकानाबाहेर नावाचा फलकही नाही.

**नागरिक संतप्त:**

स्थानिकांच्या तक्रारीनुसार, या स्टोअरमधून येणाऱ्या अनेक खाद्यपदार्थांना वास मारतो. अधिक मास आणि सणासुदीच्या काळात असे पदार्थ खाल्ल्याने अन्नातून होणाऱ्या आजारांची भीती प्रचंड वाढली आहे. स्थानिकांनी यापूर्वीही तोंडी व लेखी तक्रारी केल्या, पण प्रशासन झोपले आहे.

**FDA आयुक्तांकडे थेट तक्रार:**

FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून भेसळ आणि बोगस पदार्थांविरोधात कडक भूमिका घेतली आहे. त्याच धडाक्याची अपेक्षा करत विनोद वास्कर यांनी ५/०६/२०२६ रोजी FDA भवन, बांद्रा-कुर्ला संकुल



येथे लेखी निवेदन दिले.

निवेदनात त्यांनी संयुक्त आयुक्त, FDA ठाणे विभाग,ठाणे महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना प्रत माहितीसाठी पाठवली आहे.

**काय मागणी आहे?**

विनोद वास्कर यांनी मागणी केली आहे की, FDA च्या तपासणी पथकाने तातडीने या डार्क स्टोअरवर धाड टाकावी. सर्व परवाने आणि स्टॉक केलेल्या पदार्थांची तपासणी करावी. नियमबाह्य आढळल्यास दुकान त्वरित सील करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा.

**सवाल प्रशासनाला:**

देवेंद्र प्रकरणानंतरही प्रशासन जागे झाले नाही का? बोगस डॉक्टरांनंतर आता बोगस डार्क स्टोअर नागरिकांच्या जिवाशी खेळत आहेत. झोपले यंत्रणा पुन्हा एखादा मृत्यू झाल्यावरच जागी होणार का?

नागरिकांच्या आरोग्यापेक्षा कंपन्यांचा नफा मोठा झाला आहे का, असा सवाल आता शिळकर उपस्थित करत आहेत.

# मुदखेड–माळकोटा रोडवर कारचा भीषण अपघात; सुदैवाने जीवितहानी टळली, दोघे गंभीर जखमी

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी योगेश चौदंते :** मुदखेड-माळकोटा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाजवळ आज पहाटेच्या सुमारास एका कारचा भीषण अपघात झाला. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या मुरमाच्या ढिगाऱ्यावर जाऊन संकेतांक खांबाला धडकली व पलटी झाली. या अपघातात कारमधील दोघे जण जखमी झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई येथील अजय नवघरे (वय २१) आणि करण विनायक जोगदंड हे दोघे भाड्याने घेतलेल्या कारमधून उमरी येथे प्रवाशांना सोडण्यासाठी गेले होते. तेथून परत अंबाजोगाईकडे निघाल्यानंतर रात्रभराच्या सततच्या प्रवासामुळे चालकाला पहाटेच्या सुमारास डुलकी लागली. त्यामुळे सकाळी सुमारे सव्वा सहा वाजता श्रीकृष्ण पेट्रोल पंपासमोर व पंचकृष्ण हॉटेलजवळ वाहनावरील नियंत्रण सुटून कार मुरमाच्या ढिगाऱ्यावर चढली आणि खांबाला धडकून पलटी झाली.अपघाताच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेले व्यंकटी मुंगल यांनी हा थरार प्रत्यक्ष पाहिला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता मदतीसाठी धाव घेतली. त्यांच्या



मदतीला पंचकृष्ण हॉटेलचे मालक राजेश मुंगल, प्रमोद मुंगल, ग्रामसेवक शिवाजी मुंगल तसेच इतर सहकारी तत्काळ पोहोचले. सर्वांनी मिळून कारमध्ये अडकलेल्या अजय नवघरे आणि करण जोगदंड यांना सुरक्षित बाहेर काढले.त्यानंतर व्यंकटी मुंगल यांनी सामाजिक बांधिलकी जपत जखमींना स्वतःच्या वाहनातून मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी तातडीने उपचार सुरू करून जखमींना आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली.वेळीच मिळालेली मदत, स्थानिक नागरिकांचे सहकार्य आणि डॉक्टरांच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली. याबद्दल जखमींच्या नातेवाईकांनी मुंगल कुटुंबीय तसेच ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# रेशन दुकानाच्या आदेशावर दबावाचे राजकारण? पोहरीकरांचा प्रशासनाला थेट सवाल

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी** विजय काळे : सोयगाव तालुक्यातील पोहरी गावाच्या स्वस्त धान्य दुकानाच्या जोडणीच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. पोहरी येथील नागरिकांनी तहसीलदार कार्यालयाला दिलेल्या निवेदनातून तिडका येथील मेहमुदिया महिला बचत गट संचलित स्वस्त धान्य दुकान क्रमांक २८ सोबत जोडणी करण्याबाबत पूर्वी पारित करण्यात आलेल्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. तसेच कोणत्याही राजकीय अथवा इतर दबावाखाली येऊन या आदेशात फेरबदल किंवा रद्दबातल करण्याचा प्रयत्न झाल्यास तो असंवैधानिक व बेकायदेशीर ठरेल,असा गंभीर इशाराही देण्यात आला आहे.नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार,तहसीलदार कार्यालयाने दाखल तक्रारींची दखल घेत पोहरी गावचे स्वस्त धान्य दुकान तिडका येथील मेहमुदिया महिला बचत गटाच्या स्वस्त धान्य दुकान क्रमांक २८ ला जोडण्याचा कायदेशीर आदेश पारित केला होता. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून रेशन वितरणाबाबत निर्माण झालेल्या अडचणी दूर होण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली होती. प्रशासनाने वेळेवर निर्णय घेतल्यामुळे लाभार्थ्यांची गैरसोय कमी होऊन शेकडो कुटुंबांना दिलासा मिळाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मात्र,आता या आदेशात फेरबदल करून पोहरी गावाचे दुकान इतरत्र जोडण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.प्रशासनाने स्वतःच पारित केलेल्या आदेशावर ठाम राहून त्याची अंमलबजावणी करावी आणि कोणत्याही बेकायदेशीर दबावाला बळी पडू नये,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.निवेदनात तहसील



कार्यालयातील कारभारावरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.विविध विषयांवरील तक्रारी वेळेत निकाली काढल्या जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. गौण खनिज चोरी,पुरवठा विभागातील कथित गैरप्रकार तसेच इतर अनेक विषयांवर वारंवार तक्रारी करूनही त्यावर मुदतीत कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्यात आलेली माहिती देखील वेळेत उपलब्ध करून दिली जात नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

याशिवाय तहसील कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात वास्तव्यास नसतानाही शासनाकडून मिळणारा घरभाडे भत्ता घेत असल्याचा आरोप करण्यात आला असून अशा प्रकरणांची चौकशी करून दोषींवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.भारतीय संविधानातील तरतुदी,दप्तर दिरंगाई कायदा आणि माहिती अधिकार अधिनियमाचे काटेकोर पालन करून नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण करावे,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.पोहरी गावातील रेशन दुकानाचा प्रश्न तातडीने निकाली काढून पूर्वीचा आदेश कायम ठेवावा,अन्यथा नागरिक पुढील कायदेशीर लढा उभारतील,असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी,जिल्हा पुरवठा अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहे.

# भारतीय लोकशाहीत नवा इतिहास; नेहरूंना मागे टाकत नरेंद्र मोदी सलग सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी

## मोदींच्या ऐतिहासिक कामगिरीचे पनवेलमध्ये स्वागत; विरूपाक्ष मंदिरात महाआरती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय लोकशाहीच्या इतिहासात १० जून २०२६ हा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग सर्वाधिक काळ लोकशाही पद्धतीनं निवडून आलेले पंतप्रधान म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांनी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा तब्बल सहा दशकांहून अधिक काळ टिकून असलेला विक्रम मागे टाकला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा सांभाळत अनेक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. मे २०१४ मध्ये पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा सत्तेवर आल्यापासून त्यांनी देशाच्या सर्वोच्च पदावर सलग ४,३९९ दिवसांचा टप्पा पूर्ण केला आहे, ज्यामुळे ते सलग सर्वाधिक काळ सेवा देणारे भारताचे पहिले लोकनियुक्त पंतप्रधान बनले आहेत. या गौरवपूर्ण आणि ऐतिहासिक कामगिरी बद्दल आज पनवेलमधील विरूपाक्ष मंदिरात महाआरती करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्याची सामुहिक प्रार्थना करण्यात आली. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, महिला व बाळ कल्याण सभापती ममता म्हात्रे, पनवेल महापालिकेचे



माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, नगरसेवक सुमित झुंझारराव, अजय बहिरा, नगरसेविका रुचिता लोंढे, प्रिती जॉर्ज, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, सुनिल बहिरा, सुहासिनी शिवणेकर, अमित ओझे, गुरुनाथ लोंढे, केदार भगत, रुपेश नागवेकर, उपेंद्र मराठे, विनायक मुंबईकर, अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

सलग सर्वाधिक काळ सलग पदावर राहणाऱ्या निवडून आलेल्या पंतप्रधानांच्या बाबतीत त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मागे टाकला आहे. २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सलग विजय मिळवून त्यांनी सलग तीन वेळा पूर्ण कार्यकाळ पूर्ण करण्याच्या दिशेने आगेकूच केली आहे. गेल्या काही वर्षांत देशात अनेक पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती आणि कल्याणकारी योजनांचा विस्तार करण्यात आला आहे. गेल्या १२ वर्षांत भारताने परराष्ट्र धोरण आणि संरक्षण क्षेत्रात लक्षणीय झेप घेत जागतिक पटलावर आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. एकेकाळी आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये मर्यादित भूमिका बजावणारा भारत आज जागतिक निर्णयप्रक्रियेत प्रभावी आवाज म्हणून उदयास आला आहे. त्याचवेळी संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारत भारताने आयातदार देशापासून निर्यातदार देशापर्यंतचा महत्त्वपूर्ण प्रवास पूर्ण केला आहे. रशिया-युक्रेन संघर्षासारख्या जागतिक संकटात भारताने संतुलित भूमिका घेत संवाद आणि शांततेवर भर दिला. "हे युग युद्धाचे नाही" हा संदेश जागतिक स्तरावर चर्चेचा विषय ठरला. आंतरराष्ट्रीय मंचांवर भारताने विकसनशील देशांचे प्रश्न मांडत स्वतःची स्वतंत्र व विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. परराष्ट्र धोरणातील सक्रिय भूमिका व संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी क्षमता या दोन आधारस्तंभांवर भारताने गेल्या दशकात आपला जागतिक प्रभाव वाढवला आहे.त्या अनुषंगाने देशाच्या राजकारणात आणि जागतिक पटलावर भारताची प्रतिमा उंचावण्यात या कार्यकाळाचा मोठा वाटा राहिल्याचे राजकीय विश्लेषकांनी स्पष्ट मत व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे सत्ताविरोधी लाटेतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासाचा कायम ध्यास आणि त्यानुसार यशस्वी अंमलबजावणी केली आहे त्यामुळे आजचा दिवस देशासाठी तेवढाच महत्वाचा गौरवशाली आणि ऐतिहासिक ठरला आहे. त्या निमित्ताने आज पनवेलमध्येही महाआरती आणि त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

# सिंगोना येथील मयत पांडुरंग कदम यांच्या वारसाला एसबीआय बँकेकडून ४० लाखांचा विमा धनादेश सुपूर्द..

## दोन हजार रुपयांच्या पॉलिसीने कुटुंबाला दिला आर्थिक आधार..

**दैनिक युवक आधार**

**परतूर- जालना(अशोक ठोके) :** तालुक्यातील सिंगोना येथील रहिवासी पांडुरंग अंजीराम कदम (वय ४२) यांचे गतवर्षी २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सिंगोना पाटीवर झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी निधन झाले होते. त्यांनी भारतीय स्टेट बँकेची (एसबीआय) अवघ्या दोन हजार रुपयांचा प्रिमियम भरून जनरल इन्शुरन्स अपघाती विमा पॉलिसी काढली होती. त्यांच्या या अपघाती निधनानंतर बँकेने सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत अत्यंत तत्परतेने त्यांच्या वारसाला तब्बल चाळीस लाख रुपयांचा अपघाती विमा मंजूर केला. या मंजूर विमा रक्कमेचा चाळीस लाख रुपयांचा धनादेश मयत पांडुरंग कदम यांच्या वारसदार पत्नी शिला पांडुरंग कदम यांना १० जून २०२६ रोजी परतूर येथील 'एसबीआय' मुख्य शाखेत मुख्य शाखा व्यवस्थापकांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कुटुंबाचा मुख्य आधार हरपलेल्या कदम कुटुंबाला या कठीण काळात बँकेच्या दोन हजार रुपयांच्या पॉलिसीमुळे चाळीस लाख रुपयांचे मोठे आर्थिक छत्र लाभले आहे. या विमा रक्कम धनादेश वितरणप्रसंगी बँकेचे शाखा प्रबंधक विजय राम, उपप्रबंधक हर्षवर्धन मुन, संध्या रसाळ, प्रज्वल सावंत, योगेश धानुरे, आकाश राजनकर, अशय नानवटकर, वैष्णवी क्षीरसागर, शिवाजी कुलकर्णी, मुलगा सहदेव कदम, भाऊ विठ्ठल कदम,भरत सुरुंग यांच्यासह बँक कर्मचारी उपस्थित होते.

प्रत्येक नागरिकाने व बँकेच्या ग्राहकांनी आपल्या कुटुंबाच्या भविष्यातील सुरक्षेसाठी अशा विमा योजनांचा लाभ घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे आवाहन यावेळी बँक प्रशासनाच्या वतीने मुख्य शाखा व्यवस्थापक विजय राम यांनी केले आहे.

# गेल्या दोन महिन्यांपासून महिलेची हत्या करून पसार असलेल्या आरोपीला पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** तब्बल दोन महिन्यांपूर्वी सापडलेल्या मृतदेहाची ओळख पटवून आरोपीला अटक करण्यात पनवेल तालुका पोलिसांना यश आले आहे. करण नामदेव पाटील (राहणार फडके पाडा, शिळफाटा ठाणे) असे आरोपीचे नाव आहे.

11 एप्रिल रोजी पनवेल तालुका पोलिसांना चिंचवली जवळील पनवेल दुन्द्रे रस्त्याच्या वनविभागाच्या जागेत झुडपामध्ये एका अनोळखी महिलेचा मृतदेह सापडला होता. त्यानंतर पोलिसांनी आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून महिलेची ओळख पटवण्याचे काम सुरू केले. या महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी केली. आजूबाजूच्या गावांमध्ये जाऊन शोध घेतला. मात्र तिची ओळख पटली नाही. पोलिसांनी तब्बल 200 पेक्षा अधिक मिसिंग महिलांची पडताळणी केली.




त्यासोबत पोलिसांचा तांत्रिक तपास सुरू केला. यावेळी हत्या झालेल्या महिलेच्या वर्णनासोबत एका महिलेची माहिती प्राप्त झाली आणि पोलिसांनी त्यानुसार आपला तपास सुरू केला. यावेळी शीळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनिता देवी भगवान राजभर (वय 30) या महिलेची ओळख पटली. तालुका पोलिसांनी या महिलेच्या संपर्कात असलेल्या इसमाला ताब्यात घेतले. त्याचा मोबाईल फोन बाबत तपास केला असता तो मयत महिलेचे संपर्कात असल्याचे दिसून आले.

त्यानंतर त्याच्याकडे तपास केला असता या अनिता देवी राजभर या महिलेने त्याच्यासोबत लग्नाचा तगादा लावला होता आणि त्याला तिच्यासोबत लग्न करायचे नसल्याने करण पाटील याने 6 एप्रिल रोजी तिच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह कारमधून चिंचवली गावचे हद्दीत आणून कार मधील पेट्रोल काढले आणि ते तिच्या प्रेतावर टाकून तिला जाळून टाकले.

गेल्या दोन महिन्यांपासून सदर तपास करत असताना पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहा.पो.आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे, पो.नि.आनंद कांबळे, यांच्या सुचनेनुसार पो.उपनिरीक्षक दिपक शेळके, हर्षल राजपूत, अभिजीत व्हरांबळे, पो.अंमलदार सुनील कुदळे, आकाश भगत, शिवाजी बाबर, सतीश तांडेल, विजय देवरे, विकास साळवी, जयदीप पवार, भानुदास मोटे, भुषण म्हारसे, भिमराव खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे व गुप्त बातमीद्वाराद्वारे सदर आरोपीला गजाआड करण्यात यश मिळविले आहे.

# नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांची महाराष्ट्र नगराध्यक्ष महासंघाच्या राज्य सरचिटणीसपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत :** सेलू नगरीचे नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांची महाराष्ट्र राज्य नगराध्यक्ष महासंघाच्या वतीने राज्य सरचिटणीस म्हणून महासंघाच्या नूकत्याच मुंबई येथे पार पडलेल्या महत्वपूर्ण बैठकीत निवड करण्यात आली आहे. या बैठकीस राज्यभरातून जवळपास 100 नगराध्यक्ष उपस्थित होते, मिलिंद सावंत यांच्यावर"छत्रपती संभाजी नगर (मराठवाडा विभाग) व उत्तर महाराष्ट्र विभागाची" जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नगराध्यक्ष मिलिंद




सावंत यांच्या उल्लेखनीय सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कार्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याची दखल घेऊन त्यांची नगर परिषद महासंघाच्या महाराष्ट्र राज्य सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली आहे. या निवडी बद्दल नगराध्यक्ष महासंघ महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष रणजित चव्हाण, अध्यक्ष रूचिता राजेंद्र घोरपडे, संयोजक लक्ष्मणराव लटके यांनी स्वागत केले आहे.या निवडीबद्दल राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री नामदार श्रीमती मेघनादीदी बोर्डीकर, माजी आमदार श्री रामप्रसादजी बोर्डीकर, माजी नगराध्यक्ष श्री विनोद बोराडे, पाथरीचे नगराध्यक्ष श्री आसेफ खान, सोनपेठ नगराध्यक्ष श्री परमेश्वर कदम, जिंतूर नगराध्यक्ष श्री प्रताप देशमुख, मानवत नगराध्यक्ष श्री डॉ अंकुश लाड यांनी स्वागत केले आहे.

# आसडीच्या सुपुत्रांची भरारी; रोहित ढोरमारे शास्त्रज्ञ, तर सहा तरुणांची 'अग्निवीर'पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर:** सिल्लोड तालुक्यातील आसडी येथील भूमिपुत्रांनी शैक्षणिक आणि संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवून गावाची मान उंचावली आहे. विज्ञान क्षेत्रात शास्त्रज्ञ म्हणून झेप घेणारे रोहित पाटील ढोरमारे आणि भारतीय सैन्यदलात 'अग्निवीर' म्हणून निवड झालेले प्रवीण सर्जेराव मिरगे, वैभव आप्पा करपे, आकाश कैलास मिरगे, सागर गणपत सुरडकर व राघव समाधान सुरडकर यांचा गौरव सोहळा



नुकताच ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात पार पडला.

विज्ञान संशोधनात शास्त्रज्ञ म्हणून रोहित ढोरमारे यांनी मिळवलेले यश संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे . त्याचप्रमाणे, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सैन्यदलात स्थान मिळवलेल्या सहाही युवकांच्या जिद्दीचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. या तरुणांचा संघर्ष ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत ग्रामस्थांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "देशसेवेसाठी आणि विज्ञानासाठी योगदान देणारे हे सुपुत्र गावाची नवी ओळख ठरले आहेत," अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी तंटामुक्ती अध्यक्ष गंगाधर पाटील मेटे, सांडू पाटील सुरडकर, रघुनाथ कर्पे, भागवत पाटील मिरगे, संतोष पाटील मिरगे, गोपाल पाटील तुपे, अनिल गावंडे सर, कैलास पाटील सुरडकर, विष्णू मिरगे, अण्णा मिरगे, विष्णू मेटे, दादाराव साळवे, दगडूबा मिरगे, विश्राम मिरगे, पिराजी मिरगे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभंग निरूपण

निरूपणकार : तुळशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर

**अभंग :**

नामयाची माता विनवितसे संता ।
म्हणे पुत्रनाथा काय करूं ॥१॥

नामा चाळविला पंढरिये नेला ।
विठ्ठलीं मीनला नामदेव ॥२॥

नेणे अन्नपाणी शिवणीं टिपणीं ।
अखंड चक्रपाणि ह्रुदयीं वसे ॥३॥

संत म्हणती गोणाई विपरीत अवधारीं ।
नामा पंढरपुरीं वैष्णवांमाजीं ॥४॥



संत नामदेव महाराज

**शब्दार्थ :**

- मीनला – एकरूप झाला, समरस झाला,
- नेणे – नाही
- वसे – राहाणे, वास करणे
- विपरीत – विलक्षण
- अवधारी – समजून घेणे, लक्ष देणे

**आशय :**

भगवंत भक्तीचा छंद लागला कि दुसरे काही आठवत नाही. तोच जगात सर्व श्रेष्ठ भक्त असतो.

**भावार्थ :**

1. गोणाई माता विनंती पूर्वक संत मंडळीना प्रश्नवाचक शब्दात विचारते माझ्या मुलाला मी काय करू.
2. तुम्ही संत मंडळींनी माझे मुलास प्रेमाची भुरळ घालून पंढरपुरी नेले आणि तो निस्वार्थी पणे विठ्ठल भक्ती घ्या प्रेमाने त्यातच एकरूप झाला.
3. माझे मुलाला अन्न पाणी, शिंप्याचे शिवण काम काहीच आठवत नाही. तो शिवण कामाकडे लक्ष दिले नाही. अखंड चक्रपाणी चिंतन चालू असते . हृदयात सद्धोतीत भगवंतच वास करत आहे.
4. संत गोणाई मातेला म्हणू लागले तुम्ही या अदभुत भक्ती कडे लक्ष दे. तुझा मुलगा हा नामदेव सर्व श्रेष्ठ वैष्णव झाला आहे.

**शिकवण :**



- संसारातील सर्वांना वाटत असते कि आपल्या मुलांनी संसार वृध्द्दी करावी, उद्यैम करावा , संसार जोमाने करावा.

भगत भक्ती करताना समर्पण करावे

# पनवेल एस.टी. डेपो परिसरात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

## प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या साठवणूक आणि विक्रीप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल, वाहन जप्त !

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : पनवेल बस स्थानक परिसरात महाराजा स्वीटस कॉर्नरसमोर उड्डाणपूलाखाली रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर चहाच्या टपऱ्या आणि दुकाने रात्रभर सुरू राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या टपऱ्यांवर प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि सिगारेटची राजरोसपणे मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात असल्याची माहिती माध्यमांमधून जाहीर झाल्यानंतर रायगड झोन १ मध्ये अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने १० जून २०२६ च्या मध्यरात्री पनवेल एस. टी. डेपो इथे एक मोठी गुप्त



कारवाई केली आहे. पनवेल एस. टी. डेपो परिसरात टाकलेल्या छाप्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांची बेकायदेशीर साठवणूक आणि विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. या कारवाईत हजारो रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून वाहतुकीसाठी वापरले जाणारे वाहनही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**या धडक कारवाईचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे:**

**कारवाईचे ठिकाण आणि आरोपी (FBO)**

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी पनवेल एस. टी. डेपो रोडवर वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून खालील व्यक्तींवर कारवाई केली:

१. श्री. राम गोविंद येडे: हॉटेल दत्त इन समोर, पनवेल एस. टी.



डेपो रोड येथे फूटपाथवर तात्पुरते टेबल लावून व्यवसाय करत होते.

२. श्री. गनी सैफान बागवान (विक्रेता): पनवेल एस. टी. डेपो समोर पुलाखाली तात्पुरते टेबल आणि मारुती वॅगन आर गाडी (क्रमांक: MH43 BN0048) द्वारे विक्री करत होते.

३. श्री. अनुराग दिलीप जाधव: पनवेल एस. टी. डेपो पुलासमोर तात्पुरते टेबल आणि मारुती वॅगन आर गाडीद्वारे व्यवसाय करत होते.



४. श्री. राहुल गुप्ता: प्रतिबंधित अन्नाचा मुख्य पुरवठादार.

**जप्त केलेला मुद्देमाल आणि कारण**

कारण: मानवी आरोग्याला घातक ठरणाऱ्या प्रतिबंधित खाद्यपदार्थांची छुप्या पद्धतीने साठवणूक आणि विक्री करणे.

जप्त अन्नपदार्थ: एकूण रु. ४,२५७.५/- किमतीचा प्रतिबंधित खाद्यपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

वाहन जप्ती: गुन्ह्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतुकीसाठी वापरलेली मारुती वॅगन आर (MH43 BN0048) ही गाडी जप्त करून पनवेल शहर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (BNS): कलम १२३, २२३, २७४, २७५, आणि ३(५), अन्न सुरक्षा आणि मानके कायदा (FSSA): कलम २६(१), २६(२)(i), २६(२)(iv), २७(३)(d), २७(३)(e), ३०(२)(a) सह कलम ५९ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

**कारवाई करणारे पथक**

ही यशस्वी कामगिरी अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त (अन्न) श्री. पी. एस. नलावडे आणि सहाय्यक आयुक्त (अन्न) श्री. एन. डी. मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रत्यक्ष छाप्यात अन्न सुरक्षा अधिकारी (FSO) श्री. व्ही. एस. निकम यांच्यासह श्री. आर. बी. लोकारे, श्री. व्ही. एन. इघारे, श्री. पी. डी. माने, आणि श्री. पी. एम. शिंदे यांनी सहभाग घेतला. या कारवाईमुळे पनवेलमधील बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई केली जाईल,

असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

# वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत बैठक संपन्न !!
# प्रकल्पाच्या कामाला गती द्यावी – जिल्हाधिकारी वर्षा मीना

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे आकोट अकोला**

**अकोला, दि ९ :** वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे भविष्यात जिल्ह्यातील सिंचन क्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन, शेतीसाठी उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी तसेच दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित जमीन संपादन, मान्यता, प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.

नदीजोड प्रकल्पाच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली



इंगळे, मृद व जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, पाटबंधारे विभागाचे चिन्मय वाकोडे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान महसूल, सार्वजनिक बांधकाम, वन, जलसंपदा तसेच इतर संबंधित विभागांची भूमिका महत्त्वाची आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून प्रलंबित बाबी तातडीने मार्गी लावाव्यात.

प्रकल्पाच्या टप्पा २ व ३ मध्ये प्रस्तावित कालवा अकोला जिल्ह्यातून जात असून प्रकल्पाच्या कामांना गती द्यावी. टप्पा २ मध्ये निम्न वर्धा जलाशय ते काटेपूर्णा जलाशय (१२६.९४५ किमी) आणि टप्पा ३ मध्ये काटेपूर्णा जलाशय ते नळगंगा जलाशय (१०९ किमी) जोडण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पामुळे पावसावर अवलंबून असलेली शेती अधिक सुरक्षित होईल. पाणी उपलब्ध झाल्याने उद्योगधंद्याच्या विकासाला मदत होईल. शेती, पशुपालन व संबंधित व्यवसायांना फायदा होईल. ग्रामीण व शहरी भागांना वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध राहील.

वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पात मुख्य कालव्याची लांबी ३८८.२८ किमी असून, लाभ क्षेत्र ४ लक्ष ४ हजार २८१ हे., तसेच सिंचन क्षमता ६ लक्ष ११ हजार १५० हे. असेल. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता ९४ हजार ९६७ कोटी रू. आहे. मुख्य कालव्याच्या दोन्ही बाजूंना ५० धरणांचा प्रस्ताव आहे. त्यात ३२ नवीन धरणे असून, विद्यमान १८ पैकी १० धरणांची उंची वाढविण्यात येणार आहे.

अकोला जिल्ह्यात टप्पा-२ मध्ये मुख्य कालव्याअंतर्गत मूर्तिजापूर, अकोला, बार्शिटाकळी तालुक्यातील गावे समाविष्ट आहेत. साठवण स्थळांमध्ये कानडी, निम्न काटेपूर्णा, सिसा उदेगाव, हातोला, तसेच काटेपूर्णा प्रकल्पावरून प्रस्तावित उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. काटेपूर्णा ते नळगंगा लिंक ३ प्रकल्पाच्या नदीजोड मुख्य कालव्याची लांबी १०९ किमी आहे. मुख्य कालव्याच्या दोन्ही बाजूंना एकूण ८ धरणांचा प्रस्ताव आहे. त्यापैकी ७ नवीन प्रस्तावित असून, एका विद्यमान धरणाची उंची वाढविण्यात येणार आहे.

# विजेच्या समस्येसंदर्भात महाविकास आघाडीच्या नगरसेवकांची वीज वितरण कार्यालयाला धडक



**दैनिक युवक आधार**


**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल परिसरासह प्रभाग 14 मधील विजेच्या समस्या संदर्भात आज महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी व पदाधिकाऱ्यांनी वीज वितरण कार्यालयात धडक देवून संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला.

यावेळी स्थानिक नगरसेवक केतन भगत, लतिफ शेख, नगरसेविका कु.आर्या प्रवीण जाधव, मनिषा म्हात्रे, शिवसेना शहरप्रमुख प्रवीण जाधव, अनंत म्हात्रे, कडू, मयुरेश पाटील यांनी वीज वितरण कंपनीचे अधिकारी अमित पवार यांची भेट घेवून त्यांच्या समोर पनवेल मधील विजेच्या समस्या सोडवण्या संदर्भात चर्चा केली. तसेच छोटा खांदा. साई नगर. बावन बंगला. मोहल्ला. पनवेल मध्ये. उघडे . केबल लटकत असतात. छोटा खांदा आकडे लावणे असे अनेक विषयावर चर्चा करण्यात आले. सदर चर्चा समाधानकारक ठरून येत्या 10 दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन अधिकारी अमित पवार यांनी उपस्थितांना दिले.

# "भाळवणी गावावरती शोककळा "प्रमोद (सोनू) वाघमारे" याचा अपघाती मृत्यू"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):** भाळवणी (नाईकाची) तालुका पंढरपूर येथे नाभिक समाजातील युवक व उत्कृष्ट सलून कारागीर प्रमोद (सोनू) प्रकाश वाघमारे (२५वर्षे) याचा जैनवाडी-भाळवणी रस्त्यावर अपघाती मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूची बातमी समजताच भाळवणी व भाळवणी परिसरातील नागरिकांनी बहु गर्दी केली. प्रमोद हा उत्कृष्ट सलून कारागीर होता आपली सलूनची कला भाळवणी बरोबरच पुण्यातही तो दाखवत होता त्याच्या कलेला तरुणाई बरोबरच वृद्धांकडून



सुद्धा शाब्बासकीची थाप मिळत होती. त्याचा स्वभाव हसत खेळत असल्यामुळे तो तरुणाईमध्ये आणि भाळवणी गावात लोकप्रिय होता त्याच्या जाण्याने संपूर्ण भाळवणी गावात शोक काळा पसरली होती. त्याच्या अंत्यदर्शनासाठी नातेवाईक, मित्रमंडळी, आप्तस्वकीय, पाहुणेरावळे व ग्रामस्थांनी निवासस्थानी बहु गर्दी केली आणि त्याच्या अंत्ययात्रेत सर्व घटकातील व्यक्ती उपस्थित राहिल्या त्याच्या स्वभावाविषयी उपस्थिती आणि अनेक आठवणी जागृत केल्या व त्याच्या जाण्याने पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही भरून निघणार नाही अशा प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या. तो अविवाहित असून त्याच्या पश्चात आई वडील, एक भाऊ, भावजय, बहिणी, चुलते ,चुलती, असा मोठा परिवार आहे. नाभिक समाजातील व इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये तो सतत हिरीरीने भाग घेत होता.

# प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी तालुक्यातील रामलिंग जवळगा येथील माजी सरपंच तथा प्राचार्य डॉ. रामलिंग नागनाथराव मुळे यांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय ओबीसी शिक्षक संघाच्या वतीने पनवेल (मुंबई) येथे आयोजित ओबीसी राज्यस्तरीय अधिवेशनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संघटनेचे मार्गदर्शक तथा माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार दत्तात्रय सावंत, आमदार प्रवीण



स्वामी, मा. अनिल नाचपल्ले व राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांच्या हस्ते डॉ. मुळे यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्य करताना ओबीसी प्रवर्गातील वंचित, उपेक्षित व दुर्बल घटकांना संविधानिक हक्क मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. मुळे यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. यामध्ये महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप, अमेरिकेतील फ्लोरिडा विद्यापीठाची पीएच.डी., मराठवाडा आयकॉन ऑफ पुरस्कार, लिंगायत समाजाचा राज्यस्तरीय समाजभूषण व जीवनगौरव पुरस्कार, लातूर जिल्हा परिषदेचा आदर्श जिल्हा पुरस्कार, स्काऊट-गाईडचा 'खरी कमाई' प्रथम पुरस्कार, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विशेष पुरस्कार यांचा समावेश आहे.

तसेच विज्ञान प्रदर्शनामध्ये सलग १७ वर्षे राज्यस्तरावर व एक वर्ष राष्ट्रीय स्तरावर प्रयोग सहभागाची नोंद त्यांनी केली आहे. प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल लातूर जिल्ह्यासह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयात वाढली "मेरीगिरी ' ' ; नागरिकांचे मात्र हाल अन तक्रारी ! तहसीलदारांचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**अंजनगाव सुर्जी, संतोषराव घोडेराव प्रतिनिधी :** अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची बाब पुन्हा एकदा समोर आली आहे. सकाळी साडेअकरा वाजूनही अनेक कर्मचारी आपल्या खुर्च्यांवर अनुपस्थित असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांची निराशा होत असून प्रशासनाविषयी नाराजी वाढत आहे.

तहसील कार्यालयात दररोज ग्रामीण व शहरी भागातील शेकडो नागरिक दाखले, फेरफार, सातबारा, उत्पन्न व जात प्रमाणपत्र, रेशनकार्ड तसेच इतर महसुली कामांसाठी येत असतात. मात्र संबंधित कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याने नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे दिसून येत आहे.

याबाबत काही नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. **"सकाळी अकरा वाजता कार्यालयात येऊनही दुपारपर्यंत संबंधित कर्मचारी भेटत नाहीत. दिवसाचे काम सोडून येतो, पण काम न होता परत जावे लागते,"** अशी तक्रार एका शेतकऱ्याने केली. तर **"ज्येष्ठ नागरिकांना तासनतास उभे राहावे लागते. अनेकदा अधिकारी आणि कर्मचारी दोघेही जागेवर नसल्याने कोणाकडे दाद मागायची, असा प्रश्न निर्माण होतो,"** असे एका नागरिकाने सांगितले.

काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही कर्मचारी हजेरी नोंदवून कार्यालयाबाहेर निघून जातात, तर काहीजण नियोजित वेळेपेक्षा उशिरा कार्यालयात पोहोचतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती नसल्याने कर्मचाऱ्यांवर आवश्यक



नियंत्रण राहत नसल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात आला आहे.

पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा सुरू असतानाही नागरिकांच्या अडचणी कमी झालेल्या नसल्याचे दिसून येत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळ्या टेबलांवर चकरा माराव्या लागतात. अनेकदा संबंधित कर्मचारी उपलब्ध नसल्याने काम पुढे ढकलले जाते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अतिरिक्त भार नागरिकांवर पडत आहे.

नागरिकांनी तहसील कार्यालयात **बायोमेट्रिक हजेरीची सक्ती, सीसीटीव्हीद्वारे उपस्थितीवर देखरेख, अचानक तपासण्या आणि अनुपस्थित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई** करण्याची मागणी केली आहे. तसेच जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कार्यालयीन शिस्त सुधारण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

तहसील कार्यालयातील वाढत्या 'मेरीगिरी' मुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप न केल्यास हा असंतोष आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांना वेळेवर आणि सुलभ सेवा मिळावी, यासाठी कार्यालयातील कामकाजात पारदर्शकता आणि शिस्त आवश्यक असल्याचे मत सर्वसामान्य नागरिकांनी व्यक्त केले.